दैनिक राज्य लोकतंत्र
www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com
बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–४९ | गुरूवार दि.३० मे २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### या निष्पापाचे मारेकरी कोण

आपल्या महाशक्ती वा विश्वगुरू बनण्याचे स्वप्न उरात बाळगणाऱ्या देशात एकाच आठवड्यात तीन घटना घडल्या! पहिली घटना प्रगत व पुढारलेले राज्य म्हणून मिरवणाऱ्या महाराष्ट्र राज्यातील डोंबिवलीच्या केमिकल फॅक्टरीतील भयंकर स्फोटाची. या घटनेत किमान १३ कामगारांचा अक्षरश: कोळसा झाला. एवढा की, मृतदेहांची ओळख पटविण्यासाठी 'डीएनए' चाचणीचा आधार घेण्याची वेळ आली. या घटनेतील अजूनही काही कामगार बेपत्ता आहेत अद्याप त्यांचा शोध लागलेला नाही.

### पंतप्रधानांच्या कन्याकुमारी दौऱ्याविरोधात काँग्रेसची तक्रार

नवीदिल्ली: लोकसभा निवडणुकीचा प्रचार संपताच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कन्याकुमारीतील प्रस्तावित ध्यानधारणा दौऱ्याविरुद्ध काँग्रेसने बुधवारी (दि.२९) केंद्रीय निवडणूक आयोगाकडे तक्रार केली आहे. काँग्रेसचे नेते अभिषेक मनू सिंघवी, सरचिटणीस रणदीप सुरजेवाला व नासीर हुसैन यांनी निवडणूक आयुक्तांची भेट घेऊन पंतप्रधानांच्या दौऱ्याविषयी तक्रार दाखल केली. या तक्रारीबाबत माहिती देताना सिंघवी म्हणाले की, निवडणूक प्रचारास ४८ तासांची बंदी असताना, पंतप्रधान नरेंद्र मोदी कन्याकुमारीला जात आहेत.

# अव्वाच्या सव्वा दराने कापूस बियाण्याची विक्री

## कृषी विभागाने सतर्क राहून कारवाया कराव्यात

पुणे । प्रतिनिधी

खरीप हंगामाच्या तोंडावर राज्यातील अनेक भागांमध्ये अव्वाच्या सव्वा दराने कापूस बियाणांची विक्री केली जात आहे. तर काही भागांमध्ये बी–बियाणांचा काळाबाजार सुरु आहे. दोनच दिवसांपूर्वी यवतमाळमध्ये प्रतिबंधित बियाणे विक्री प्रकरणी कृषी विभागाच्या वतीने मोठी कारवाई करण्यात आली होती. त्यानंतर आता अकोला जिल्ह्यात कृषी विभागाच्या भरारी पथकाकडून अव्वाच्या सव्वा दराने बियाणांची विक्री करणाऱ्या एका कृषी सेवा केंद्रावर कारवाई करण्यात आली आहे. त्यामुळे आता ऐन खरिपाच्या तोंडावर बी–बियाण्याच्या काळ्या बाजाराला चांगलाच ऊत आलेला पाहायला मिळत आहे. मात्र कृषी विभागाने यासाठी सतर्क राहून अशी विक्री करणाऱ्यांवर अंकूश आणण्याची गरज आहे.



सध्याच्या घडीला बाजारात शेतकऱ्यांना कापसाचे बियाणे मिळत नसल्याने शेतकरी त्रस्त आहेत. तर दुसऱ्या बाजूला कृषी केंद्रांकडून शेतकऱ्यांना नडविले जात असून, कापसाचे प्रति बियाणे पॅकेट १४०० रुपयांना विक्री केले जात आहे. अकोला जिल्ह्यातील तेल्हारा तालुक्यातील अडसूळ येथे हा प्रकार समोर आला आहे. कृषी विभागाने सापळा रचून येथील कृषी केंद्रावर कारवाई केली ◀◀ पान २ वर

### नफेखोरीसाठी कृत्रिम टंचाई

यंदा कृषी विभागाच्या परवानगीनुसार कापूस बियाणे विक्री लवकर सुरू झाली आहे. अशातच कापूस बियाणे पुरवठादार कंपन्यांसह वितरकांची नफेखोरीही सुरू झाली आहे. कृत्रिम टंचाई करण्यासाठी मागणी अधिक असलेल्या कापूस वाणांचा पुरवठाच संबंधित कंपन्यांनी केलेला नाही. बियाणे कमी आहे, अशी बतावणी या कंपन्या करू लागल्या आहेत. यामुळे बाजारात संबंधित बियाण्याची टंचाई दिसत आहे. काही ठिकाणी जादा दरासोबतच लिंकिंग करण्याचेही प्रकार सुरू आहेत. कापूस बियाणे बाजारात मक्तेदारी, सद्दी असलेल्या कंपन्यांना कुठलाही आवर घालण्याची किंवा तंबी देण्याची कार्यवाही कृषी विभागाने केलेली नसल्याने या कंपन्या मनमानी करीत आहेत.

# २४ तासांत मान्सून होणार केरळात दाखल!



पुणे । प्रतिनिधी

पुढील २४ तासांत मान्सून केरळात दाखल होण्याची शक्यता आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार मान्सून केरळमध्ये दाखल होण्यासाठी अनुकूल परिस्थिती कायम आहे. यामुळे पुढील ५ दिवसांत केरळमध्ये आणि अंदमान निकोबारमध्ये मुसळधार पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. यासोबतच अंदमान आणि निकोबार बेटांवर जोरदार पृष्ठभागाचे वारे वाहण्याची शक्यता आहे. १ जूनला तामिळनाडू आणि दक्षिण कर्नाटकमध्ये देखील पावसाचा अंदाज आहे.

'रेमल' चक्रीवादळामुळे पोषक वातावरण तयार झाल्यामुळे मान्सूनचे केरळमध्ये लवकर आगमन होत आहे. सुरुवातीला ◀◀ पान २ वर

# जितेंद्र आव्हाडांकडून महाडमध्ये मनुस्मृतीचे दहन

महाड । प्रतिनिधी

शालेय अभ्यासक्रमात मनुस्मृतीमधील काही श्लोकांचा समावेश करण्याचा प्रयत्न करण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयाविरोधात राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते जितेंद्र आव्हाड आक्रमक झाले आहेत. मनुस्मृतीचे दहन करण्याचा निर्णय त्यांनी जाहीर केला होता. बुधवारी दुपारी ते महाडमध्ये दाखल झाले आणि येथील चवदार तळ्याजवळ त्यांनी मनुस्मृतीचे दहन केले.



चवदार तळ्याजवळ जाण्यापूर्वी आव्हाड यांनी टिपणीसांच्या ◀◀ पान २ वर

### बाबासाहेबांचा फोटो फाडल्याने आव्हाडांवर ॲट्रॉसिटी दाखल

आमदार जितेंद्र आव्हाड यांच्या विरोधात महाड शहर पोलिस ठाण्यात ॲट्रॉसिटी कायद्याखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. धार्मिक भावना दुखावल्याचाही आरोप त्यांच्यावर करण्यात आला आहे. मनुस्मृती दहन आंदोलनात आव्हाड यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो फाडल्याचा त्यांच्यावर आरोप आहे. त्यांच्यासह २४ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### चुकीबद्दल आव्हाडांकडून महाराष्ट्राची माफी

अनावधानाने माझ्याकडून माझ्या बाबाचा फोटो नकळत फाडला गेला, ही अत्यंत गंभीर चूक असल्याचे सांगत आमदार जितेंद्र आव्हाड यांनी तमाम नागरिकांची नतमस्तक होऊन माफी मागितली आहे. तसेच आंबेडकरी अनुयायीही मला माफ करतील, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. या घटनेनंतर त्यांच्या घराभोवती पोलीस सुरक्षा वाढविण्यात आली आहे. आमच्याकडून अनावधनाने मनुस्मृतीचे पुस्तक फाडले जात असताना, त्यात बाबासाहेब आंबेडकर यांचाही फोटो फाडला गेल्याचे दिसत आहे. ही आमची अक्षम्य चुकी आहे. त्यामुळे या घटनेबद्दल कार्यकर्त्यांकडून झालेल्या घटनेबद्दल महाराष्ट्रातील तमाम नागरीकांची लीन होऊन, नतमस्तक होऊन माफी मागतो. हे प्रकरण माझ्या हृदयाला लागले आहे. मी माझ्या आयुष्यात एकदा भुमिका घेतली की माफी मागत नाही, पण मी ज्या अर्थी माफी मागत आहे, त्या अर्थी ते मी मनापासून बोलत आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील जनतेने मला माफ करा, असे आमदार जितेंद्र आव्हाड म्हणाले.

# आता सातबाऱ्यावर येणार आईचंही नाव

### १ मे २०२४ नंतर जन्मलेल्यासाठी होणार लागू

पुणे । प्रतिनिधी

राज्य सरकारने काही महिन्यांपुर्वी वडिलांच्या नावाबरोबर आईचे नाव सरकारी कागदपत्रांमध्ये लावण्याचा निर्णय घेतला होता. महिला व बालकल्याण विभागाच्या या निर्णयानंतर मुख्यमंत्री एकनाश शिंदे यांच्यासह उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्या नावाच्या पाटीवर आईचे नाव झळकले होते. याच निर्णयाच्या धर्तीवर भूमी अभिलेख विभागाने निर्णय घेतला असून १ मे २०२४ नंतर जन्माला आलेल्या व्यक्तीच्या नावे जमीन, सदनिका घेण्यासाठी या नियमाचे पालन करावे लागणार आहे. तर अर्जदारासह आईचे नाव द्यावे लागणार आहे. सध्या या नियमानुसार संगणकप्रणाली अपडेट करण्याचे काम भूमी अभिलेख विभागामार्फत सुरू आहे.

आता अर्जदाराच्या नावाबरोबर आईच्या नावाचा समावेश करावा लागणार आहे. याबाबत भूमी अभिलेख विभागास कार्यवाही करण्याच्या सूचना सरकारने दिल्या असून, सहा महिन्यांत अंमलबजावणी करावी लागणार आहे. त्यामुळे आता सातबाऱ्यावर अर्जदारासह आता त्याच्या आईचे नाव देखील लागणार आहे. या निर्णयाप्रमाणे १ मे २०२४ ◀◀ पान २ वर

# काँग्रेसचा उद्या पासून राज्यात दुष्काळी दौरा

## सरकार झोपले असल्याची केली टिका

मुंबई । प्रतिनिधी

**काँग्रेस पक्ष जनतेला न्याय देण्यासाठी दुष्काळ पाहणी दौऱ्यावर जात असून प्रत्येक विभागाचा दौरा करून विभागीय आयुक्तांना निवेदन दिले जाईल. ३१ मे पासून या दौऱ्याला सुरुवात होत आहे, अशी माहिती महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी दिली.**

टिळक भवन येथे झालेल्या पत्रकार परिषदेत पटोले म्हणाले की, राज्यात दुष्काळाची तीव्रता प्रचंड आहे, अनेक भागात १५ ते २० दिवस पिण्याचे पाणी मिळत नाही. राज्यातील ७५ टक्के भागात कोरडा दुष्काळ असून परिस्थिती अत्यंत भयावह आहे. राज्यातील जनता दुष्काळाने होरळपत असताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे मात्र सुट्टीवर गेले आहेत. हे सरकार झोपले आहे, अशी टिका यावेळी करण्यात आली. पिण्याच्या पाण्यासह जनावराच्या चाऱ्याचा प्रश्नही गंभीर आहे. सरकारी अनास्थेमुळे टँकर माफियांचा सुळसुळाट सुरु आहे. पाण्याच्या टँकरला जीपीएस लावल्याचे सरकार सांगत आहे पण ते जीपीएस काढून मोटारसायकलला लावला जातो. सरकार पाण्याच्या टँकर माफियांकडूनही पैसे वसूल करते की काय? असा प्रश्न उपस्थित होत आहे. दुष्काळग्रस्तांना मदत करण्यासाठी ◀◀ पान २ वर



# निवडणूक निकाल येताच बदलणार भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**लोकसभा निवडणुकीचा निकाल लागताच भाजपच्या पक्ष संघटनेत मोठे फेरबदल केले जाण्याची शक्यता आहे. केंद्रात सरकार स्थापन झाल्यानंतर भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि पदाधिकाऱ्यांमध्येही बदल केले जाणार आहेत.**

भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी नड्डा यांचा कार्यकाळ यावर्षी जून महिन्यात संपणार आहे. त्यांचा कार्यकाळ गेल्यावर्षी जुनमध्येच संपला होता. मात्र, लोकसभा निवडणूक लक्षात घेता त्यांना १ वर्ष मुदतवाढ दिली होती. भाजपच्या पक्ष घटनेनुसार, अध्यक्षांचा कार्यकाळ संपण्यापूर्वीच नव्या अध्यक्षांची नियुक्ती केली जाते. नव्या अध्यक्षांनी पदभार सांभाळल्यानंतर संघटनेतील पदाधिकाऱ्यांची निवड केली जाते. त्यामुळे आता अध्यक्ष बदलल्यावर पदाधिकारीही बदलले जातील. भाजप अध्यक्षपदाच्या शर्यतीत केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव यांचे नाव सर्वात पुढे आहे. यादव हे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या अतिशय जवळचे मानले जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचाही भूपेंद्र यादव यांच्यावर विश्वास आहे. केंद्रात भाजपचे सरकार स्थापन झाल्यास अध्यक्षपदी भूपेंद्र यादव यांचीच वर्णी लागण्याची शक्यता आहे.

# मुख्यमंत्री शिंदेंची संजय राऊतांना नोटीस

## मानहानीकारक वक्तव्य केल्याचा ठपका, राऊतांनी उडविली खिल्ली

मुंबई । प्रतिनिधी

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांना कायदेशीर नोटीस पाठवली आहे. तीन दिवसांत माफी मागा, अन्यथा कारवाईला सामोरे जा, असा इशारा नोटीसमधून देण्यात आला आहे. नोटीस मिळाल्यानंतर संजय राऊत यांनी ''अब आयेगा मजा'' असे म्हणत सोशल मीडियावर पोस्ट करीत या नोटिसची खिल्ली उडविली आहे.**

'नितीन गडकरी यांच्या प्रचारात फडणवीस नाईलाजाने उतरले, एकनाथ शिंदे यांनी प्रत्येक



मतदारसंघात पैसे वाटले असे अनेक आरोप खासदार संजय राऊत यांनी दैनिक सामना मधील रोखठोक या सदरामध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर

# केंद्र सरकार गहू आयात करण्याच्या तयारीत

## महागाईवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रयत्न

नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**केंद्र सरकार लोकसभा निवडणुक निकालानंतर रशियाकडून गहू आयात करण्याच्या तयारीत आहे. गेल्या तीन वर्षांपासून देशातील गहू उत्पादनात सतत घट आली आहे. केंद्र सरकार गव्हाचे दर नियंत्रणात आणण्यासाठी तब्बल सहा वर्षांनंतर आयात करण्याच्या तयारीत असल्याची माहिती समोर येत आहे.**

यंदा गहू खरेदीला मोठा ब्रेक लागला. सरकारची गहू खरेदी ६.२५ टक्क्यांनी कमी राहिल्याची शक्यता उद्योगाकडून वर्तवली जात आहे. त्यामुळे नवी दिल्लीतील व्यापाऱ्यांनी गहू आयातीवरील ४० टक्के शुल्क हटवण्याची मागणी केली. केंद्र सरकार रशियासारख्या ◀◀ पान २ वर

### सरकारला शेतकऱ्याची भिती

केंद्र सरकारने गहू आयातीवर मौन बाळगले आहे. कारण सध्या निवडणुकांचा माहोल गरमागरम आहे. गहू आयातीचा विषय चर्चेत आला तर शेतकरी मतदार नाराज होईल, आणि त्याचा फटका मतपेटीतून बसेल, अशी विद्यमान सरकारची धारणा आहे. त्यामुळे गहू आयातीबद्दल कसलाही विचार करत नसल्याचे सरकारकडून सांगण्यात येत आहे. परंतु ४ जूनला निकाल लागतील. त्यानंतर गहू आयात करण्यात येईल, असे जाणकार सांगतात.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.२९ मे २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू :२२.००क्विंटल | १,८०० | ३,१०० | २,३५५ |
| ज्वारी/हायब्रिड :९५.०० क्विंटल | १,७२५ | २,९०० | २,३६० |
| मूग : १.५० क्विंटल | ५,००१ | ७,१०० | ६,०५० |
| तूर : १९.०० क्विंटल | १०,००० | १२,१५० | ११,२४४ |
| उडीद : ०.५० क्विंटल | ४,००० | ४,००० | ४,००० |
| बाजरी: ११.०० क्विंटल | २,२०० | २,६९१ | २,४२२ |
| चिंच/लोकल: ४७.०० क्विंटल | १,७०० | ६,३०० | ४,००० |
| सोयाबीन:९०.५० क्विंटल | ४,४७५ | ४,४८१ | ४,४७७ |
| हरभरा: ४.०० क्विंटल | ६,४०१ | ६,५९० | ६,४९७ |

# राजधानी तापली, पारा ५१.४ अंशावर

## दिल्लीत रेकॉर्ड ब्रेक तापमान



नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**दिल्लीच्या मुंगेशपूर हवामान केंद्रात ५१.४ अंश सेल्सिअस तापमान नोंदवले गेले. शहराच्या इतिहासातील आतापर्यंतची ही सर्वोच्च तापमान नोंद आहे. देशात पुढील २ दिवस तरी उष्ण वातावरण कायम राहण्याची शक्यता असल्याचे भारतीय हवामान विभागाने मंगळवारीच स्पष्ट केले होते.**

उत्तर भारतातील उष्णतेच्या लाटेबाबत, वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. नरेश कुमार म्हणतात, ''राजस्थान, पंजाब, हरियाणा, दिल्ली–एनसीआर, पश्चिम उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेशात पुढील दोन दिवस उष्णतेची लाट राहील. त्यानंतर, उष्णतेची लाट थोडी कमी होईल. अरबी समुद्रातून येणाऱ्या वाऱ्यांमुळे तापमानात घट होणार आहे. येत्या ३–४ दिवसांत केरळमध्येही उष्णतेची लाट कमी होण्याची शक्यता आहे. वायव्य आणि मध्य भारतातील प्रचलित उष्णतेची लाट ते तीव्र उष्णतेची लाट ३० मे २०२४ पासून हळूहळू कमी होण्याची शक्यता आहे. पुढे केरळमध्ये नैऋत्य मोसमी पाऊस सुरू होण्यासाठी आणि पुढील ३–४ दिवसांत ईशान्येकडील राज्यांच्या काही भागांत पुढे जाण्यासाठी परिस्थिती अनुकूल असल्याचे देखील हवामान विभागाने म्हटले आहे.

### बिहारमध्ये उष्माघाताने ४८ विद्यार्थीनी बेशुद्ध

बिहारमध्ये अद्याप शाळा सुरू असून, बुधवारी आज राज्यातील बेगुसराय आणि शेखपुरा येथील शाळांमध्ये तब्बल ४८ विद्यार्थिनी वर्गातच बेशुद्ध होऊन पडल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. शेखपुरामधील एका शाळेत भयंकर उकाड्यामुळे विद्यार्थिनींची तब्येत एवढी बिघडली की, त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करावे लागले. एकाच वेळी एवढ्या विद्यार्थिनी बेशुद्ध पडल्याने शिक्षकही गोंधळून गेले. या विद्यार्थिनींच्या नातेवाईकांना माहिती देण्यात आली. नंतर या विद्यार्थिनींना रुग्णालयात दाखल करण्यात आले. दरम्यान, बेगुसरायमध्येही अशीच घटना घडली. तिथे मटिहानी मध्य विद्यालयामध्ये भीषण उकाड्यामुळे १८ विद्यार्थिनी बेशुद्ध पडल्या. त्यांना उपचारांसाठी रुग्णालयात दाखल करावे लागले.

## अग्रलेख

# या निष्पापाचे मारेकरी कोण

आपल्या महाशक्ती वा विश्वगुरू बनण्याचे स्वप्न उरात बाळगणाऱ्या देशात एकाच आठवड्यात तीन घटना घडल्या! पहिली घटना प्रगत व पुढारलेले राज्य म्हणून मिरवणाऱ्या महाराष्ट्र राज्यातील डोंबिवलीच्या केमिकल फॅक्टरीतील भयंकर स्फोटाची. या घटनेत किमान १३ कामगारांचा अक्षरश: कोळसा झाला. एवढा की, मृतदेहांची ओळख पटविण्यासाठी 'डीएनए' चाचणीचा आधार घेण्याची वेळ आली. या घटनेतील अजूनही काही कामगार बेपत्ता आहेत अद्याप त्यांचा शोध लागलेला नाही. दुसरी घटना घडली ती पंतप्रधान व गृहमंत्री यांचे गृहराज्य असणाऱ्या गुजरात राज्यातील राजकोटमध्ये. राजकोटमध्ये उभारण्यात आलेल्या गेमिंग झोनमध्ये आग लागली आणि या गेमिंग झोनचा 'डेथ झोन' झाला. या घटनेत २७ जणांचा मृत्यू झाला. ज्यात काही निष्पाप लहान मुलांचाही समावेश आहे. तिसरी घटना देशाची राजधानी असलेल्या नवी दिल्लीत घडली. राजधानी दिल्लीच्या विवेक विहार भागातील एका खासगी बाल रुग्णालयास आग लागून सात नवजात बालकांचा मृत्यू झाला. या देशाच्या तीन वेगवेगळ्या भागात घडलेल्या तीन वेगवगळ्या घटना असल्या तरी त्यात एक साम्य नक्कीच आहे ते म्हणजे या तीनही घटनांत सुरक्षेचे उपाय व त्याची अंमलबजावणी हा विषय पूर्णपणे धाब्यावर बसवण्यात आला व ज्या सरकारी यंत्रणेवर याकडे डोळ्यात तेल घालून लक्ष ठेवण्याची जबाबदारी आहे त्या यंत्रणेने आपले डोळेच मिटून घेतले होते.

डोंबिवलीतील घटनेनंतर यंत्रणा सांगते की, ज्या कंपनीत स्फोट झाला त्या कंपनीने बॉयलर वापराची परवानगीच घेतली नव्हती. तर राजकोटमध्ये ज्या गेमिंग झोनमध्ये आग लागली त्या गेमिंग झोनने ते चालू करताना रीतसर परवाना काढला नव्हता की, महापालिकेच्या अग्निशमन विभागाकडून ना हरकत दाखला घेण्याची तसदी उचलली होती. राजधानीत आग लागलेल्या खासगी बाल रुग्णालयानेही अग्निशमन विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र घेतलेले नव्हते. एवढेच काय पण या रुग्णालयाच्या परवान्याची मुदत संपलेली असतानाही परवान्याचे नूतनीकरण न करताच ते सुरू ठेवण्यात आले होते आणि विशेष म्हणजे हे रुग्णालय एक बीएएमएस डॉक्टर चालवत होता. त्याला असे रुग्णालय चालविण्याचा अधिकार आहे की नाही? याची खातरजमाच आपल्या 'कार्यक्षम' यंत्रणेने केलेली नाही. थोडक्यात सार काय तर वरवर पाहता या तीनही घटना अपघात वाटत असल्या तरी त्यामागच्या प्रमुख कारणाचे एकच समान सूत्र आहे ते म्हणजे आपल्या यंत्रणेचा व व्यवस्थेचा बथ्थडपणा. नियम पाळण्यासाठी नव्हे तर ते मोडण्यासाठीच किंवा त्यात पळवाटा काढण्यासाठीच असतात, लाचखोरी करून भ्रष्ट यंत्रणेला आरामात खिशात घालता येते ही वृत्ती आपल्या बथ्थड व्यवस्थेत इतकी दृढ झाली आहे की, आताशा कोणाला त्याचे काही वाटेनासे झाले आहे. जोवर दुर्घटना होत नाही तोवर सुरक्षा उपायांची पूर्तता व त्याची आवश्यक व नियमित तपासणी यावर साधी चर्चाही होत नाही आणि म्हणूनच या व अशा देशात घडणाऱ्या असंख्य अपघातातील बळी हे अपघाताचे नव्हे तर आपल्या असंवेदनशील व बथ्थड बनलेल्या व्यवस्थेचे बळी आहेत. त्यामुळेच असे अपघात घडले की, काही काळ गरमागरम चर्चा होते. तोवर चौकशी समिती, दोषींवर कडक कारवाई, वगैरेच्या घोषणा होतात आणि एकदा का प्रकरण थंडबस्त्यात गेले की, सगळे काही थंडगार होते ते पुढची दुर्घटना होईपर्यंत.

१३ जून १९९७ रोजी राजधानी दिल्लीतील 'उपहार' चित्रपटगृहाला आग लागून ६० जणांचा कोळसा झाला होता. तेव्हापासून आजवर देशात जेवढ्या केवढ्या अशा अपघातांच्या घटना घडल्या त्यावेळी अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी युद्धपातळीवर कडक उपाययोजना करण्याच्या चर्चा व घोषणा झाल्या. मात्र, ना देशातले असे अपघात थांबले, ना त्यांची संख्या रोडावली. उलट उपहार अग्नीकांडातील आरोपी अन्सल बंधूंच्या निर्दोष मुक्ततेने अशा नियम, कायदे सर्रास पायदळी तुडवण्याच्या मनोवृत्तीला एवढे बळ दिले की, आज ही दृढ मनोवृत्ती हीच समाजासाठीची सर्वांत मोठी समस्या बनलेली आहे. आपल्याकडे नियम, कायदे, विविध प्रकारच्या सुरक्षेचे मापदंड, त्याबाबतची मानके हे सगळे कागदी अलंकारच आहेत हेच देशात वारंवार घडणा-या अशा घटनांमध्ये सप्रमाण सिद्ध होते. अशा घटना-अपघातानंतर त्यामागे यंत्रणांच्या निष्क्रियतेचे, बेमुर्वतखोरपणाचे, भ्रष्टाचाराचे, बेफिकिरीचे पुरावे बाहेर येतात. नियम मोडणारे वा त्यात पळवाटा शोधणा-यांना यंत्रणेचे केवळ अभयच नाही तर अर्थपूर्ण सा हे ही उघडकीस येते. दोषींवर अत्यंत कडक कारवाईच्या घोषणा होतात पण अगदी अपवादानेही कुठल्या दोषीला त्याच्या कृत्याची शिक्षा मिळाल्याचे पहायला मिळत नाहीच. विशेष म्हणजे त्याचे आपल्या कुणाला काही वाईट वगैरे वाटत नाही की, दोषींना शिक्षा झालीच पाहिजे यासाठी कुणी आग्रह वगैरे धरत नाही, रस्त्यावर उतरत नाही, आंदोलन करत नाही, बंदच काय पण साधा दुखवटाही पाळत नाही. व्यवस्थेचा हाच बथ्थडपणा, असंवेदनशीलता अशा अपघातांमध्ये बळी पडणाऱ्या निष्पापांच्या प्राणहानीचे प्रमुख कारण आहे.



## श्रेयांस सचिन लेंभे याचे दहावी परीक्षेत सुयश

**बीड । प्रतिनिधी**

येथील भगवान विद्यालयाचा विद्यार्थी श्रेयांस सचिन लेंबे यांने मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या दहावी परीक्षे मध्ये घवघवीत यश संपादन केले आहेत, इयत्ता दहावी मध्ये त्यांने ८९ टक्के मार्क घेऊन उत्तीर्ण होण्याचा मान मिळवला आहे .या त्याच्या दहावी परीक्षेच्या यशाबद्दल बंकट स्वामी महाविद्यालयाचे प्राध्यापक विवेक वैद्य सर प्रा अनिता वैद्य यांनी त्याचा सत्कार केला व मार्गदर्शन केले .याचबरोबर आजोबा विलास लेंबे, कॅनरा बँकेचे निवृत्त बँक अधिकारी मुकुंद भूतपल्ले, वाल्मीक चाटे, ह भ प मोहन महाराज खरमाटे, महावीर शेठ बोरा, तुकाराम जोशी साहेब , चंपावती पत्र चे महादेव नाना साळुंके, आई वडील व नातेवाईकांनी श्रेयस याला या यशाबद्दल खूप खूप शुभेच्छा दिल्या व पुढील शिक्षणासाठी मार्गदर्शन केले.

# बॅरिस्टर स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर जन्मोत्सव विविध उपक्रमाने साजरा

**बीड । प्रतिनिधी**

**येथील जवाहर कॉलनी मधील सावरकर स्मारक येथे मंगळवार दिनांक २८ मे २०२४ यादिवशी १४१ व्या स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जन्मोत्सवानिमित्त सर्व सावरकर प्रेमींच्या वतीने मानवंदना अभिवादन करून विविध उपक्रमाने हा जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.**

अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ, कर्मचारी आघाडी व सावरकर विचार सभा आणि सार्वजनिक सावरकर जयंती उत्सव समिती यांच्या वतीने हा कार्यक्रम आयोजित केला होता. यावर्षी बीड जिल्ह्यातील दहा केंद्रांवर निबंध स्पर्धा घेण्यात आली तसेच इयत्ता दहावी बारावी च्या परीक्षेमध्ये विशेष प्राविण्य मिळवलेल्या आणि विविध क्षेत्रात जसे क्रीडा संस्कृतीत व शैक्षणिक क्षेत्रात प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा या कार्यक्रमाच्या निमित्ताने सत्कार करण्यात आला या कार्यक्रमाला डॉ .पि.के .कुलकर्णी डॉ. सुभाष जोशी ,प्रा. चंद्रकांत मुळे अॅड श्री रविंद्र देशमुख आणि ध्येयपूर्ती गुरुकुल प्रकल्प संचालक श्री. विजय इंगळे हे मान्यवर मंचावर उपस्थित होते. निबंध स्पर्धेमध्ये सुमारे ६०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता तसेच क्रीडा सांस्कृतिक व शैक्षणिक क्षेत्रात विशेष कामगिरी केलेल्या चाळीस गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला तसेच सर्व केंद्र प्रमुखांचा आणि मान्यवरांचा सावरकर प्रतिमा शाल आणि स्मृतीचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला कार्यक्रमाच्या




सुरुवातीला वेदमूर्ती निर्मळ देवा यांचे मंत्रोचारात स्वातंत्र्यवीरांना अभिवादन करण्यात आले.चि अर्जुन नितीन थिगळे ह्या विद्यार्थ्याने अभ्यासपूर्ण असे सावरकर यांचे विचार व्यक्त केले. सौ प्रणिता गंगाखेडकर यांनी यावेळी उचित मार्गदर्शन केले. अध्यक्ष श्री विजय इंगळे सर यांनी सावरकर चरित्र सांगून युवकांना प्रेरणादायी असे अध्यक्षीय मार्गदर्शन केले. वेळी शहरातील सर्व सावरकर प्रेमी विविध संस्था व राजकीय पक्षांचे प्रमुख प्रतिनिधी पदाधिकारी यांची विशेष उपस्थिती होती हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जिल्हाध्यक्ष श्री चंद्रकांत जोशी कर्मचारी आघाडीचे अध्यक्ष तथा कार्यक्रमाचे संयोजक श्री विनायक वझे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. त्यांना जिल्हा सचिव श्री. विनायक जोशी सर यांनी सहकार्य केले. यावेळी कर्मचारी आघाडी, महिला आघाडी, वकील आघाडी, युवक आघाडी व पुरोहित आघाडीसह सर्व सावरकर प्रेमींनी अथक प्रयत्न करून हा कार्यक्रम यशस्वी केला. नगरपरिषदेच्या वतीने स्वच्छता व मंडप डेकोरेशन करण्यात आले होते. बीड शहरातील सुजाण व प्रतिष्ठित सावरकर प्रेमी नागरिकांनी या कार्यक्रमाला खूप मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवली होती सकाळी सात ते दहा या वेळेत हा कार्यक्रम घेण्यात आला. श्री क्षीरसागर सर यांनी आकर्षक अशी रांगोळी या ठिकाणी साकारली होती.

# मतमोजणीच्या कालावधीत मतमोजणी परिसरात फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १४४ लागू

**बीड । प्रतिनिधी**

**भारत निवडणूक आयोगाने दि. १६ मार्च २०२४ रोजी सन २०२४ च्या सार्वत्रिक लोकसभा निवडणूकीचा कार्यक्रम घोषीत केला असून कार्यक्रम घोषीत केल्याच्या दिनांकापासून आदर्श आचार संहिता अंमलात आहे. ३९- बीड लोकसभा मतदारसंघाचे मतदान दिनांक १३ मे २०२४ रोजी झाले असून विधानसभा निहाय मतमोजणी, दिनांक ०४ जून २०२४ रोजी शासकीय तंत्रनिकेतन, नाथापूर रोड बीड येथे विधानसभा निहाय सकाळी ८.०० वाजेपासून होणार आहे.**

बीड जिल्ह्यातील लोकसभा निवडणूकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून आणि कायदा व सुव्यवस्था अबाधीत राखण्यासाठी ज्या ठिकाणी मतमोजणी होणार आहे, त्या ठिकाणी फौजदारी प्रक्रीया संहिता १९७३ चे कलम १४४ लागू करणे आवश्यक आहे. मतमोजणी केंद्राच्या ठिकाणापासून २०० मीटर परिसरातील सर्व पक्ष कार्यालय/उमेदवारांचे मंडप, सर्व दुकाने, मोबाईल, कॉर्डलेस फोन, पेजर, वायरलेस सेट, ध्वनीक्षेपके, सर्व प्रकारचे फेरीवाले व ईतर ईलेक्ट्रॉनिक उपकरणे, निवडणूकीच्या कामाव्यतिरीक्त खाजगी वाहन व निवडणूक कामाव्यतिरीक्त व्यक्तीस प्रवेश करण्यास प्रतिबंध करणे आवश्यक आहे. जिल्हादंडाधिकारी दिपा मुधोळ मुंडे यांनी कळविले आहे फौजदारी प्रक्रीया संहिता १९७३ चे कलम १४४ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन या आदेशाव्दारे असे निर्देश देत आहे की, शासकीय तंत्र निकेतन नाथापूर रोडच्या २०० मीटर परीसरातील सर्व पक्ष कार्यालय/उमेदवारांचे मंडपे, सर्व दुकाने, मोबाईल, फॉडलेस फोन, पेजर, वायरलेस सेट, ध्वनीक्षेपके, सर्व प्रकारचे फेरीवाले व ईतर ईलेक्ट्रॉनिक उपकरणे, निवडणूकीच्या कामाव्यतिरीक्त खाजगी वाहन, संबंधीत पक्षाचे उमेदवाराचे चिन्हांचे प्रदर्शन व निवडणूक कामाव्यतिरीक्त व्यक्तीस प्रवेश करण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे. हा आदेश निवडणूकीची कामे हाताळतांना कायदा वर सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये म्हणुन दिनांक ०४ जून २०२४ रोजी सकाळी ०६.०० वा. पासून ते मतमोजणीची प्रक्रिया संपेपर्यंत अंमलात राहील. तसेच प्रत्येक ईसमावर हे आदेश तामील करणे शक्य नसल्यामुळे हे एकतर्फी आदेश ध्वनीक्षेपकावर पोलीसांनी जाहीर करुन त्यास प्रसिध्दी द्यावी असेही आदेशीत करीत आहे.

# गटविकास अधिकाऱ्यांकडून कायद्याचे उल्लंघन खासगी गाडीवर लिहिले महाराष्ट्र शासन

## कायद्याचे उल्लंघन करणारावर कायदेशीर कारवाई करा-कैलास दरेकर

**आष्टी । प्रतिनिधी**

शासनामार्फत अधिकारी / कर्मचाऱ्यांना वाहने उपलब्ध करून देण्यात येत असली तरी , काही कर्मचारी व त्यांच्या नातेवाईकांकडून खाजगी वाहनावर सरकारी नावाच्या पाट्यांचा सर्रास दुरुपयोग होताना दिसून येत आहे . आष्टी येथील पंचायत समितीचे गटविकास अधिकारी राजेंद्र गरजे हे देखील याला अपवाद नसून ते आष्टी पंचायत समितीमध्ये रुजू झाल्यापासून सरकारी वाहन उपलब्ध असूनही खाजगी वाहनाचा वापर करून




महाराष्ट्र शासन या नावाची पाटी लावून मोटार वाहन अधिनियम १९८८ नुसार सरकारी अधिकारी कर्मचाऱ्यांना खाजगी वाहनावर सरकारी नावाची पाठी वापरण्यास सक्त मनाई असताना सुद्धा नियमचा भंग करून शासनाच्या आदेशाचे उल्लंघन करीत आपल्या स्वत:च्या मालकीची खाजगी गाडीवर , गाडी क्रमांक एम एच २३ ए ३७ ७३ या गाडीवर महाराष्ट्र शासन नावाची पाटी लावून गटविकास अधिकारी राजेंद्र गरजे हे तालुका बाहेर व तालुक्यामध्ये या खाजगी वाहनाचा वापर करून वाहन कायद्याचं उल्लंघन करीत आहेत . संबंधित गटविकास अधिकारी राजेंद्र गरजे यांच्या वाहनावर वाहन अधिनियम १९८८ नुसार कारवाई करण्यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण शेतकरी सेनेचे जिल्हाध्यक्ष कैलास दरेकर यांनी जिल्हाधिकारी यांना , आष्टी तहसीलदार मार्फत निवेदन देऊन , तात्काळ कारवाईची मागणी केली आहे.

# नाथापूरकरांनो सावध व्हा, गावाचा सामाजिक सलोखा बिघडत चालला आहे

**नाथापूर । प्रतिनिधी**

नाथापूर हे बीड तालुक्यातील ३००० च्या जवळपास मतदार असलेले गाव, या गावांमध्ये शनिवारी आठवडी बाजार मोठ्या प्रमाणात भरतो. जवळपास बीड तालुक्यातील व्यापारी मग त्यामध्ये बैल व्यापारी, भुसार व्यापारी, भाजीपाला विक्रेते, खाऊ विक्रेते, कपडा विक्रेते हे येत असतात. जवळपासच्या १५ ते २० गावाची महत्त्वाची बाजारपेठ म्हणून नाथापूर या गावची ओळख पूर्वीपासूनच आहे. मागच्या तीन चार वर्षांपूर्वी नाथापूर म्हणजे शांत संयमी लोकांचे गाव म्हणून ओळखले जायचे. अगदी सर्व जाती धर्मातील लोक आपल्या जातीपाती विसरून फक्त माणुसकी ही जात गृहीत धरून गुण्यागोविंदाने राहत होते.गावांमध्ये कधी काही वाद निर्माण झाला तर ते अगदी सहजरीत्या समजून सांगून यातून वाद मिटवला जायचा. या मध्ये प्रामुख्याने नाव घ्यायचे झाल्यास कै. डॉ. मंत्री, कै. माधवराव चव्हाण, कै.दत्तात्रय उदावांत,कै. मदनराव गिराम,काशिनाथ चव्हाण,श्री.अश्रुबा शिंदे, श्री मदनराव चव्हाण, श्री शाखेरभाई, श्री शिवाजी वक्ते,श्री.सखाराम शिंदे, आणि गावातील सर्व प्रतिष्ठित व्यक्ती यांची नावे आवर्जून घ्यावी लागतील. बाजारातील वाद असू द्या की गावातील लोकांचा, किंवा बाहेरगावातील लोकांचा उपरोक्त लोकांकडे हा वाद गेला की तो मिटलाच म्हणून. अशी ही लोकं होती. परंतु मागील काही वर्षापासून गावामध्ये पूर्वीचा जातीय सलोखा असल्याचे निदर्शनास येताना दिसून येत नाही. जाती-जातीमध्ये थोडासा जरी तेढ निर्माण झाला की त्याला गावातीलच काही राजकीय आदृष्य शक्ती या वादाला खतपाणी घालतानाची जाणीव सध्या गावकऱ्यांना होत आहे. या मागची कारणे ही तशीच आहेत,सध्याची तरुण पिढीच्या हाताला काम नसल्याने ती बेकार आहे. त्यामुळे सहाजिकच हे तरुण व्यसनाकडे वळत आहेत. गावातील कितीतरी तरुणांचे विवाह होणे बाकी आहे. त्यामुळे तरुणाने व्यसनाकडे न जाता स्वत:चा छोटा मोठा उद्योग व्यवसाय सुरू करावा असं सांगणारा अवलिया सध्या तरी गावांमध्ये कोणीही दिसून येत नाही. सर्व राजकीय पुढाऱ्यांनी राजकारण करावे पण ते तरुण पिढी बिघडवणार किंवा सामाजिक सलोखा बिघडवणारा नसावा. आत्ताच झालेल्या लोकसभा २०२४ च्या मतदानापासून तर सामाजिक दूरी आणखीनच वाढत चालले आहे. या गावांमध्ये मात्र सामाजिक सलोखा टिकवण्यासाठी सध्यातरी कोणीच प्रयत्न करत नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे शांत असलेल्या नाथापूर गावामध्ये सध्या काय होईल हे सांगता येत नाही. रोज संध्याकाळी कोणती ना कोणती घटना गावात होतच आहे. यामुळे गावातील नागरिकांना हा धसकाच लागून राहिला आहे. दोन-तीन दिवसाला गावामध्ये शुल्लक गोष्टीवरून काहीतरी वाद वाढत चालले आहेत.गावात तंटामुक्ती समिती आहे की नाही हे गावकऱ्यांना अवगत नाही. असेल तरी समिती काय करते हे माहीत नाही. राहिला पोलीस प्रशासनाचा भाग त्यांना तर गावांमध्ये गस्त घालण्यासाठी वेळच नाही. त्यामुळे आजही नाथापूर येथील नागरीक पिंपळनेर पो. स्टे. माजी पीएसआय श्री जाधव साहेब यांचा पॅटर्न राबवावा मागणी करत आहेत. यामध्ये जाधव साहेबांनी जो वाद मिटवण्याचा पॅटर्न वापरला तो सध्याचे पीएसआय श्री घुगे साहेब यांनी वापरावा आणि सामाजिक सलोखा बिघडणाऱ्या अदृश्य शक्तीचा शोध घ्यावा.मग सध्याची परिस्थिती ही नक्कीच वेगळी होईल. त्यामध्ये पोलीस स्टेशनच्या कारभारात राजकीय हस्तक्षेप जास्त प्रमाणात वाढल्याने यातून विनाकारण एकतर्फी निर्णय घेण्याची वेळ पोलीस प्रशासनाला येणार नाही जे योग्य आहे ते योग्यच निर्णय घ्यावा अशी विनंती गावकऱ्याकडून होताना दिसून येत आहे. यामुळे गावातील वाद हे जागेवरच मिटतील.

गावाचा विकास आणि गावाची प्रतिष्ठा कायम ठेवायची असेल तर गावातील प्रतिष्ठित नागरिक आणि सुशिक्षित नागरिकांनी पुढे यावे व तरुणांना योग्य ते मार्गदर्शन करावे. जेणेकरून ते आपल्या शैक्षणिक प्रवासामध्ये किंवा उद्योग-धंद्यामध्ये पुढे जातील व या जातीपातीच्या वादातून दूर राहतील. नसता नाथापुरकरांनो सावध राहा गावचा सामाजिक सलोखा नक्कीच बिघडत आहे आणि तो सर्वांसाठीच घातक आहे. त्यामुळे विचार करा व गावची प्रतिष्ठा अबाधित ठेवा.आशी चर्चा सध्या गावातील नागरिकांकडून होत आहे.

## पान १वरून...

### अव्वाच्या सव्वा दराने

आणि संबंधित कृषी केंद्र चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला. राज्यात बऱ्याच ठिकाणी सध्या बियाण्यांचा प्रचंड तुटवडा निर्माण करण्यात आला असून, काळ्या बाजारात दुप्पट दराने बियाणे मिळत असल्याचा आरोप शेतकऱ्यांकडून होत आहे. शेतकऱ्यांना सकाळपासूनच उन्हातही रांगेत थांबावे लागत आहे. मात्र, त्यानंतरही पुरेसे बियाणे मिळत नसल्याच्या तक्रारी आहेत. केवळ दोन किंवा तीन बियाण्याचे पॅकेट हातात दिले जात आहे. शेतकऱ्यांच्या या अडचणी सोडविण्यासाठी कृषी विभागाने योग्य नियोजन लावण्याची गरज आहे.

-------

### जितेंद्र आव्हाडांकडून

कुटुंबीयांची भेट घेतली. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार नुकताच तिसरी ते बारावी वर्गाचा अभ्यासक्रमाचा आराखडा जाहीर केला आहे. त्यामध्ये मनाचे श्लोक आणि भगवद्गीतेचा अध्याय पाठ करायला लावा, अशी शिफारस केली आहे. त्यानंतर शालेय अभ्यासक्रमात मनुस्मृतीचे श्लोक शिकवले जाणार असल्याची चर्चा सुरू झाली आहे. त्यावरून विविध राजकीय पक्ष आणि संघटना आक्रमक झाल्या आहेत. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट, संभाजी ब्रिगेडकडून मनुस्मृतीचे श्लोक शिकवण्यास विरोध केला आहे. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी विरोध दर्शवला होता. तर अजित पवार गटाचे मंत्री आणि समता परिषदेचे अध्यक्ष छगन भुजबळ यांनी विरोध केला आहे. आमच्या विचारधारेला हे मान्य नसल्याचे त्यांनी स्पष्टपणे म्हटले आहे.

-------

### २४ तासांत मॉन्सून

३१ मे ला मान्सून केरळमध्ये दाखल होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला होता. पण आता पुढील २४ तासांत मान्सून केरळात दाखल होण्याचा अंदाज हवामान खात्याने व्यक्त केला आहे. सध्या मान्सूनला केरळमधून पुढे जाण्यासाठी परिस्थिती देखील अनुकूल होत आहे. तसेच दक्षिण अरबी समुद्राचा अधिक भाग, मालदिवचे उर्वरित भाग आणि कोमोरिन क्षेत्राचा देखील मान्सूनला पोषक वातावरण तयार होऊन त्याची आगेकूच वेगाने होत आहे. मेघालयातील एकाकी ठिकाणी अत्यंत मुसळधार पावसासह अति मुसळधार पावसाचा अंदाज आहे. उप-हिमालयीन पश्चिम बंगाल आणि सिक्कीम, केरळ आणि काही ठिकाणी मुसळधार ते अति मुसळधार पाऊस होईल. यासह अरूणाचल प्रदेश, आसाम आणि मेघालय मध्ये विजांचा कडकडाट आणि सोसाट्याचा वारा येण्याची शक्यता आहे. नागालँड, मणिपूर, मिझोरम आणि त्रिपुरा आणि उप-हिमालयीन पश्चिम बंगाल आणि सिक्कीम भागात देखील पावसाचा अंदाज आहे.

-----------

### काँग्रेसचा उद्या पासून

सरकारला आचार संहितेचा अडसर येतो पण टेंडरसाठी आचारसंहिता आडवी येत नाही. आपत्तीमध्ये निवडणूक आयोगाची परवानगी घेऊन मदत देता येते. गुरूवारी (दि.३०) संध्याकाळी छत्रपती संभाजी नगरला जाऊन ३१ तारखेपासून दुष्काळ पाहणी दौरा केला जाईल व आयुक्तांना भेटून माहिती दिली जाईल आणि ४ जूननंतर पुन्हा दुष्काळी पाहणी दौरा केला जाणार आहे. मराठवाडा विभागात काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, उत्तर महाराष्ट्रात विधिमंडळ पक्षनेते बाळासाहेब थोरात, पश्चिम महाराष्ट्रात माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, विदर्भात विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, अमरावती भागात माजी मंत्री यशोमती ठाकूर तर कोकण विभागात प्रदेश कार्याध्यक्ष नसीम खान यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसचे शिष्टमंडळ शेतात जाऊन दुष्काळाची पाहणी करणार आहेत.

------

### आता सातबाऱ्यावर

नंतर जन्मलेल्या व्यक्तीच्या नावे जमीन खरेदी करताना आईचे नाव लावावे लागणार आहे. तसेच ज्यांनी याच्या आधी खरेदी व्यवहार केला आहे. त्यांना देखील आईचे नाव लावने बंधनकारक करण्यात आले आहे. भूमी अभिलेख विभागाने घेतलेल्या या निर्णयामुळे येथून पुढे आईचे नाव देखील सातबाऱ्यावर असणार आहे.

**तीन ते सहा महिन्यांचा कालावधी**

तांत्रिक अडचणी दूर करण्यासाठी तीन ते सहा महिन्यांचा कालावधी लागण्याची शक्यता आहे. यासाठी रेकॉर्ड तयार करताना सध्याच्या सॉफ्टवेअरमध्ये आईच्या नावाचा रकाना (कॉलम) नाही. तोच तयार करण्यासाठी कार्यप्रणाली (सिस्टीम) अपडेट करावी लागणार आहे. याला तीन ते सहा महिन्यांचा कालावधी जाईल. यामुळेच सध्या जुन्या व्यक्तींच्या नावासोबत आईच्या नावाचा उल्लेख करणे शक्य होणार आहे. या निर्णयानुसार १ मे २०२४ च्या आधीच्या व्यवहारात आईचे नाव लावण्यासाठी सदरची व्यक्ती त्याची आई असल्याचा पुरावा द्यावा लागणार आहे. या पुराव्याची तलाठ्यामार्फत शहानिशा झाल्यानंतर तशी नोंद होईल.

----------


### केंद्र सरकार गहू आयात

प्रमुख निर्यातदाराकडून शुल्क मुक्त गहू आयातीसाठी खासगी व्यापारी आणि पीठ उद्योगाला परवानगी देणार असल्याची माहिती सुत्रांनी दिली आहे. सुत्रांच्या माहितीनुसार रशियामध्ये गहू पीक काढणीला येणार आहे. केंद्र सरकार जूननंतर गव्हावरील आयात शुल्क हटवू शकतं, असं रोलर फ्लोर मिलर्स फेडरेशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष प्रमोद कुमार यांनी सांगितले. खुल्या बाजारातील गव्हाचे दर नियंत्रणात ठेवण्यासाठी गव्हावरील आयात शुल्क रद्द करण्याचा चांगला पर्याय आहे. त्यामुळे केंद्र सरकारकडून व्यापाऱ्यांची मागणी मान्य होण्याची शक्यता आहे, असे उद्योगाचे मत आहे. आयात शुल्क हटवलं तर गहू आयात करण्यासाठी आम्ही तयार आहोत, असे उद्योगाकडून सांगण्यात आले आहे. नवी दिल्लीतील व्यापारी राजेश पहाडिया जैन यांनी सांगितले की, ३ दशलक्ष टन आयात करावी लागेल. आणि त्यासाठी रशिया चांगला पर्याय असल्याचं पहाडिया सांगतात. देशातील गहू उत्पादनाला २०२२ आणि २०२३ मध्ये उष्णतेच्या लाटांचा फटका बसला. गहू उत्पादनात घट झाली. परिणामी जगातील दुसऱ्या क्रमांकाच्या गहू उत्पादक भारताने निर्यातबंदी घातली. केंद्र सरकारने यंदा ११२ दशलक्ष टन गहू उत्पादनाचा अंदाज दिला आहे. परंतु प्रत्यक्षात मात्र गहू उत्पादन ६.२५ टक्क्यांनी कमी असल्याची उद्योगाचा अंदाज आहे. त्यामुळे गव्हाच्या दरात वाढ होऊ लागली आहे.

----------

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
गुरुवार, दि. ३० मे २०२४ ३

## होळकर जयंती निमित्त सत्यपाल महाराजांच्या कार्यक्रमाला उपस्थित रहा -भाई विष्णुपंत घोलप



**बीड :** राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या २९९ जयंती निमित्त समाज सुधारक सप्तखंजीरी वादक सत्यपाल महाराज यांचा समाज प्रबोधनात्मक कार्यक्रम शुक्रवार दिनांक ३१ मे रोजी सायंकाळी ७ वाजता हनुमान मंदिर मैदान महालक्ष्मी नगर शिदोड ता. जि. बीड येथे होणार असून या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन शेतकरी कामगार पक्षाचे जिल्हा चिटणीस भाई विष्णुपंत घोलप यांनी केले आहे. राजमाता अहिल्यादेवी होळकर यांनी संपूर्ण महाराष्ट्रभर समाजासाठी मोठे कार्य केले. त्यांनी अनेक ठिकाणी मंदिरे बांधली, पाण्यासाठी बारव बांधल्या इतरही अनेक समाज उपयोगी कामे यांनी केले. याची आठवण म्हणून त्यांच्या २९९ या जयंतीनिमित्त बीड तालुक्यातील हनुमान मंदिर मैदान महालक्ष्मी नगर येथे थोर समाज सुधारक तथा खंजिरी वादक सत्यपाल महाराजांचा समाजप्रबोधनपर कार्यक्रम होणार आहे. हा कार्यक्रम ३१ मे रोजी सायंकाळी सात वाजता होणार असून जिल्ह्यातील सर्व समाज बांधवांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहावे असे आवाहन शेतकरी कामगार पक्षाचे जिल्हा चिटणीस भाई विष्णुपंत घोलप यांनी केले आहे.

# धान्य साठविण्यासाठी असलेले 'पेव' काळाच्या ओघात नामशेष

## आधुनिक काळात शेतमाल साठविण्यासाठी गोदाम,शितगृहाचा वाढता वापर!

ज्योतीराम पांढरपोटे । माजलगाव

शेतकरी शेत माल पिकवतो आणि बाजारात न्हेवून विकतो सुगीच्या दिवसात सर्वच शेतकऱ्यांचा मला तयार झाल्यामुळे बाजारातील आवक वाढते,आणि अर्थशास्त्र नियमा प्रमाणे पुरवठा वाढलाकी वस्तूची किमत कमी होते, त्यामुळे भाव पडतात.शेतकऱ्यांना योग्य दर भेटत नाही शेतकरी तोट्यात जातो आणि हे वर्ष न वर्ष चालू आहे. पण काही व्यापारी मोठ्याप्रमाणावर शेतमाल खरेदी करून ठेवतात.आणी साठवलेला माल पुढे ते वाढीव दराने विकतात नफा कमवतात.पण हे पूर्वी घडत नव्हते. आपल्या पूर्वजांनी व्यापाऱ्यांचा हा धूर्तपणा ओळखून व बाजारपेठेचा, सुगीच्या दिवसाचा अभ्यास करून किवा स्वताचे संरक्षण करण्यासाठी व धान्य सुरक्षित राहण्यासाठीधान्य कोठार पेव / बळद निर्माण केले होते,पण आधुनिक काळात शेतमाल साठविण्यासाठी मोठ मोठे गोदाम व शितगृहाचा वापर वाढल्याने पुर्वीच्या काळी ग्रामीण भागात धान्य साठविण्यासाठी असलेले पेव (बळद ) काळाच्या ओघात नामशेष झाले आहेत.

आजूनही आपण ग्रामीण भागातील गावामध्ये जुन्या वाड्यात असे धान्य कोठार पेव (बळद) पाहण्यास मिळतात.पुर्वीच्या काळी दुष्काळ, निसर्गाचा लहरीपणा,रोगराई महामारी,गावावर पडणारे दरोडे, चोऱ्यामाऱ्या, विविध आक्रमणे आली की प्रथम धनधान्याची लुट करून घेऊन जायचे. इतिहासात अश्या अनेक प्रकरणाची नोंद आहेत.आक्रमणाच्या कालखंडात आक्रमकांपासून किंवा इतर कोणत्याही त्रास पासून आपले धान्य सुरक्षित रहावे व याचा ठावठिकाणा शत्रूला लागू नये म्हणून ही कल्पना त्यावेळेच्या कालखंडात आपल्या लोकांनी राबवली होती. वर्षभर शेतात काम करून तयार झालेले धान्य आपल्या पासून गेले तर वर्षभर उदरनिर्वाह कसा करायचा ही मोठी समस्या त्याकाळी होती. म्हणून आपल्या पूर्वजांनी वाड्यातच जमीनीखाली गुप्तपणे धान्य साठविण्याची धान्य कोठार पेव (बळद) निर्माण केले.धान्य कोठार पेव (बळद) मध्ये धान्य साठवले की जास्त दिवस टिकून राहते. धान्याला कीड लागत नाही, कारण धान्याची साठवणूक जो पर्यंत ऑक्सिजन पोचतो तिथं पर्यंत करत नाही जिथून ऑक्सिजन नसतो तिथून साठवणूक केली जाते.या मध्ये उष्णता असते धान्य चांगले राहते.धान्य कोठार पेव (बळद) बंद केल्यानंतर आतील हवा ऑक्सिजन हळू हळू कमी होतो.व धान्य कोठार पेव (बळद) आतून शीत राहते. एखादे धान्य कोठार पेव (बळद) सकाळी उघडले



धान्य कोठार पेव (बळद) पेव म्हणजे जमिनीमधून पाणी झिरपून आत येणार नाही असे तयार केलेले तळघर.

की दुपारी किंवा दुसऱ्या दिवशी त्यात पूर्ण हवा खेळलेली आणि पुरेसा ऑक्सिजन जमा झाला असल्यावरच धान्य काढण्यासाठी आत उतरत असत. त्यासाठी एक परीक्षा घेत असत. त्यात कंदील सोडला जातो. त्याची ज्योत टिकली की धान्य काढण्यासाठी माणूस आत उतरत असे.तोपर्यंत कोणी आत जाऊ शकत नसे.गेलाच तर ऑक्सिजन अभावी त्याचा मृत्यू ओढवतो.पेवात चांगलीच उष्णता असते.धान्य कोठार पेव (बळद) चा फायदा पूर्वीच्या लोकांनी चांगला करून घेतला होता. एकद्या वर्षी निसर्गाच्या लहरीपणामुळे पाऊस झाला नाही तर हयात साठा करून ठेवलेले धान्य उपयोगात येत होते.

आता मोठ मोठे गोदाम आहेत शीतगृह आहेत पण धान्य कोठार पेव (बळद)सारखे कमी आणि अति सुरक्षित शेतमाल राहत नाही आपण बघतो बातम्या मध्ये किती शेतमाल नासाडी होते.सरकारी गोदामातून किती धान्य नासाडी होते (ती होते का जाणून बुजून केली जाते हा भाग वेगळा) पण ही साधना मध्ये शेत माल साठवून ठेवणे शेतकऱ्यांना परवडत नाही किंवा याबद्दल पुरेशी माहिती नाही आणि ही खर्चिक बाब आहे.गोदामाचे भाडे शेतमालाचा इन्सुरंस,त्यामूळे शेतकरी सुगीच्या दिवसात शेतमाल विकतो ह्याचा फायदा काही धूर्त लोक,व्यापारी लोक उचलतात हे सरस चालू आहे.धान्य कोठार पेव (बळद) धान्य साठवल्याने ही पद्धत जरी जुनी असली तरी ती फायद्यची आणि कमी खर्चिक आहे शिवाय आपला माल आपल्यापाशी सुरक्षित राहतो. जास्त जागा ही लागत नाही रोगाचा प्रधुर्भाव होत नाही त्यावर खर्च ही होत नाही ऊन वारा पाऊसा पासूनही बचाव होईल आणि सर्वात महत्वाचे म्हणजे व्यापारी वर्गा कडून होणारी आर्थिक फसवणूक थांबेलसुगीच्या दिवसात शेतमालाला भाव नसेल तर शेतमाल कमी खर्चात साठवणूक करून ठेवता येतो.एक लक्षात ठेवा कीशेतमाल जर जरा जास्त दराने विकला गेला तर तो निव्वळ नफा असतो.शेतकऱ्यांने आता हार्ड वर्क बरोबर स्मार्ट वर्क ही करणे हि काळाची गरज आहे.

### धान्य कोठार पेव (बळद) माहिती

धान्य कोठार पेव (बळद) रचना कश्याप्रकारे असते हे आपण जाणून घेऊया जमिनीमध्ये ठराविक खोलीपर्यंत एक गोल खड्डा खणतात.त्यामध्ये प्रथम दोन फुट उंचीपर्यंत दगडांचे सोलिंग करत.त्यावर जाड मुरूम टाकून परत वाळू टाकली जाते.वाळूवर माती, शेण,राख,पांढरी माती,लाल माती यांचे मिश्रण करून लेप देत.त्यावर घुमटाकार विटचे बांधकाम केले जाते.नंतर धान्य कोठार पेव (बळद) आतून शेणा मातीने सारवून घेत असत.

### पेव पांढऱ्या चिकन मातीतच बांधतात

धान्य कोठार पेव (बळद) हे पांढऱ्या शुभ्र असलेल्या मातीतच (चिकन माती) सुरक्षितराहू शकते हे पूर्वजांना माहिती होते.ह्या मातीत पावसाचे किंवा अन्य मार्गाने आलेले पाणी कमी झिरपते.पाणी धान्य पर्यंत पोचत नाही धान्य सुरक्षित रहाते,पांढरी चिकण माती पडत नाही.ही मातीथरचे असलेलेवजन सहज पेलू शकते. धान्य कोठार पेव (बळद) पेव ढासळत नाहीत.

### पेव (बळद ) ची रचना

धान्य कोठार पेव (बळद) यांची रचना सर्वात वर चार- सहा फुटांच्या थरात पेवांचे तोंड सरळ उभट असते.ते सर्व बाजूंनी बांधून घेत उत्तरले जाते. त्याच्या खाली या तोंडापेक्षा थोडा कमी व्यासाचा मार्ग असतो.तिथ आढी बांधतात.या ठिकाणी पेवाचं झाकण असत. आढी म्हणजे विटांचे बांधकाम.पेवाचे तोंड आयताकृती दगडाने किंवा बंद केले जाते. त्यावर कडबा / गवत /माती टाकून तोंड बुजवून टाकतात. जेणेकरून आत मध्ये वॉटरप्रूफ बनते.पेवाचा व्यास पंधरा फुटांपासून ते सत्तर फुटापर्यंत किंवा त्याही पेक्षा जास्त असतो.व उंची दहा फुटांपासून ते जमिनीमध्ये हार्ड दगड लागेपर्यंत. एका धान्य कोठार पेव (बळद) मध्ये साधारणत १५० ते २५० क्किंटल धान्य बसते.''

## नवनियुक्त गटशिक्षणाधिकारी मनोज कोल्हे यांचा शिक्षक संघटनेच्या वतीने सत्कार

किल्लेधारूर । प्रतिनिधी

तालुक्याला तब्बल १० वर्षानंतर प्रभारीराज ग्रहण सुटून राज्यसेवा आयोगामार्फत उपशिक्षणाधिकारी या पदावर निवड झालेले पदाचे गटशिक्षणाधिकारी म्हणून मनोज कोल्हे यांची नियुक्ती प्रशासनामार्फत करण्यात आलेली आहे, नवीन पदभार स्वीकारलेले गटशिक्षणाधिकारी मनोज कोल्हे यांचा सर्व शिक्षक संघटनेच्या



समन्वय समितीच्या वतीने स्वागत सत्कार करण्यात आला.

गटशिक्षण कार्यालयाला प्रभारी राजसंपून तब्बल दहा वर्षानंतर राज्यसेवा आयोगा मार्फत उपशिक्षणाधिकारी या पदावर निवड झालेले तरुण तसेंचहुशार व अभ्यासू असलेले मनोज कोल्हे यांची धारूर च्या गटशिक्षणाधिकारी पदी नियुक्ती करण्यात आली आहे, डायरेक्ट पदाचा गटशिक्षणाधिकारी आल्यामुळे तालुक्यात शिस्त निर्माण होऊन शिक्षणाचा स्तर आणखीन उंचावन्यास उपयोग होईल. सर्व घटकाशी समन्वय साधून तालुक्यातील गोर, गरीब,वंचित व ऊसतोड मजुराच्या मुलांना जास्तीत जास्त शिक्षणाच्या प्रवाहात आणून त्यांच्या शिक्षणाचा स्तर उचवाण्यात येईल असे गटशिक्षणाधिकारी यांनी सांगितले. तसेंच तालुक्यातील शिक्षकांच्या समस्या शिक्षक संघटनाशी समन्वय साधून तात्काळ सोडवल्या जातील असे आश्वासन मनोज कोल्हे यांनी सत्कार प्रसंगी दिले. सत्कार प्रसंगी जेष्ठ शिक्षणाधिकारी शिवाजीराव अंडील, केंद्रप्रमुख व्यंकटेश गडदे व सय्यद हकीम, तालुकाध्यक्ष रमेश रुद्रे, रत्नाकर डोंगरे, विकास अडागळे, सुदर्शन काळे, ज्ञानेश्वर कातखडे, किशोर मरळकर आदी शिक्षक उपस्थित होते.

## अशोक माध्यमिक विद्यालयाची निकालाची उज्वल परंपरा कायम

वडवणी । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,पुणे यांनी मार्च- २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल सोमवार दि.२७ मे २०२४ रोजी मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर जाहीर करण्यात आला. या मध्ये वडवणी तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रात अग्रगण्य म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अहिल्यादेवी होळकर शिक्षण प्रसारक मंडळ चिंचाळा संचलित अशोक माध्यमिक विद्यालय चिंचाळा ता वडवणी जि.बीड या शाळेने प्रती वर्षा प्रमाणे उज्वल यशाची परंपरा कायम ठेवली असून इ.१०वी बोर्ड परिक्षा२०२४ चा निकाल



९७.५० % लागला आहे इ.१० वी बोर्ड परिक्षेस शाळेतुन एकुण १२० विद्यार्थी परिक्षेस बसले होते त्यापैकी ६६ विद्यार्थी विशेष प्राविण्याने उत्तिर्ण झाले आहेत तर ३५ विद्यार्थी प्रथम श्रेणीने उत्तिर्ण झाले असुन द्वितीय श्रेणीने १६ विद्यार्थी उत्तिर्ण झाले आहेत यामध्ये शाळेतुन प्रथम क्रमाकाने येण्याचा मान १) कु.दर्शीका श्रीधर घुगे या विद्यार्थीणीने ९१.४० % गुण घेऊन पटकावला आहे तर २ )चि.सुर्याक्ष हानुमंतराव पारखे या विद्यार्थ्यांने ९१.२० % गुण घेऊन दुसरा क्रमांक पटकावला आहे तर ३ ) कु.कोमल महादेव मोरे या विद्यार्थीणीने ८९.४० % गुण घेऊन तृतीय व ४) कु. मंजुषा वैजनाथ डोंगरे या विद्यार्थिनीला ८७.८० % चतुर्थ आली आहे.

त्याबद्दल अशोक माध्यमिक विद्यालयाच्या उज्वल यशाबद्दल संस्थाचे संस्थापक मा. प्रा.सर्जेराव काळे सर,शाळेचे मुख्याध्यापक मा. सांवत सर,इ.१०वी चे वर्ग शिक्षक डोंगरे सर,चोरमले सर,सचिन सर,पटाईत सर,शाळेचे सर्व शिक्षक शिक्षिकेत्तर कर्मचारी व चिंचाळा, तिगाव, दुकडेगाव, ह.पिंपरी तांडा,चिंचवडगाव या गावातील व पंचक्रोशितील पालकानी उत्तिर्ण विद्यार्थ्यांचे कौतुक व अभिनंदन केले आहे. इ.१० वी बोर्ड परिक्षेत उत्तिर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन करुण पुढिल वातचालीस शुभेच्छा दिल्या.शाळेच्या वतीने मनपुर्वक अभिनंदन करुण पुढील वाटचालीस हार्दीक शुभेच्छा !

## उत्कर्षा पवळ यांनी मिळवले दहावीमध्ये घवघवीत यश

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील सुलेमान देवळा येथील एक गरीब कुटुंबातील विद्यार्थीनी काल लागलेल्या दहावी परीक्षेत घवघवीत यश प्राप्त करुन म्हणजे ९३.४० टक्के मार्क मिळवून कुटुंबाला एक आशेचा किरण दाखवला आहे उत्कर्षा अमोल पवळ या विद्यार्थिनीचे पालक सलुन व्यवसाय व आई सुनिता या शिवणकाम करून आपल्या कुटुंबाला सांभाळत आहेत व शिक्षणाची गोडी असणाऱ्या विद्यार्थीने दाखवुन दिले की पैसा म्हणजे सर्वस्व नाही कष्ट करुन व दिवसरात्र परिश्रम करुन देखील पैसेवाल्यांच्या यादीत नाव आणता येतं हे उत्कर्षा ने दाखवुन दिले उत्कर्षा ही आरोग्य सेवक सोन्याबापू पवळ यांची नात व पत्रकार कवी प्रेम पवळ यांची पुतणी आहे या उत्कर्षाच्या घवघवीत यशामुळे सर्व नातेवाईक व पंचक्रोशीतुन त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होतं आहे.




**जाहीर प्रगटन**

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**

जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं.१५६/२०२४
शहादेव पि.लिंबाजी शिंदे विरुद्ध
रा.ग्रामपंचायत कार्यालय कोळवाडी ता.जि.बीड
पहा
१. शहादेव पि.लिंबाजी शिंदे रा.कोळवाडी ता.जि.बीड.

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून मयत दादा खंडू शिंदे यांचा दिनांक १०-०५-१९४० रोजी मृत्यू झालेला असुन त्यांचे मृत्यूची नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास मृत्यु यांच्या नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास कोळवाडी ता.बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मृत्यु नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे कोळवाडी ता. जि. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २८/५/२०२४ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले.
सदर प्रकरणात पुढील तारीख २८/६/२०२४ ही आहे.

**मार्फत** **स्वाक्षरित/-**
**ॲड.मिलींद उबाळे** **तहसिलदार, बीड**



**जाहीर प्रगटन**

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**

जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं.१४९/२०२४
संतोष अशोक काशिद
विरुद्ध ग्रामपंचायत कार्यालय साक्षाळपिंप्री ता.जि.बीड
पहा
१. संतोष अशोक काशिद रा.साक्षाळपिंप्री ता.जि.बीड.

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून मयत गणपती लक्ष्मण काशीद यांचा दिनांक २५/०६/१९४७ रोजी मृत्यू झालेला असुन त्यांचे मृत्यूची नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास मृत्यु यांच्या नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास साक्षाळपिंप्री ता.बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मृत्यु नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे साक्षाळपिंप्री ता. जि. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २८/५/२०२४ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले.
सदर प्रकरणात पुढील तारीख --२०२४ ही आहे.

**मार्फत** **स्वाक्षरित/-**
**ॲड.मिलींद उबाळे** **तहसिलदार, बीड**



**जाहीर प्रगटन**

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**

जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं.१५१/२०२४
लक्ष्मण दिनकर काशिद
विरुद्ध ग्रामपंचायत कार्यालय साक्षाळपिंप्री ता.जि.बीड
पहा
१. लक्ष्मण दिनकर काशिद रा.साक्षाळपिंप्री ता.जि.बीड.

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून मयत लक्ष्मण भयानजी काशिद यांचा दिनांक १५/०५/१९०६ रोजी मृत्यू झालेला असुन त्यांचे मृत्यूची नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास मृत्यु यांच्या नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास साक्षाळपिंप्री ता.बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मृत्यु नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे साक्षाळपिंप्री ता. जि. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २८/५/२०२४ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले.
सदर प्रकरणात पुढील तारीख --२०२४ ही आहे.

**मार्फत** **स्वाक्षरित/-**
**ॲड.मिलींद उबाळे** **तहसिलदार, बीड**



**जाहीर प्रगटन**

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**

जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं.१५०/२०२४
सखाराम अंसाराम काशिद
विरुद्ध ग्रामपंचायत कार्यालय साक्षाळपिंप्री ता.जि.बीड
पहा
१. सखाराम अंसाराम काशिद रा.साक्षाळपिंप्री ता.जि.बीड.

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून मयत देवराव लक्ष्मण काशिद यांचा दिनांक २०/०८/१९४८ रोजी मृत्यू झालेला असुन त्यांचे मृत्यूची नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास मृत्यु यांच्या नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास साक्षाळपिंप्री ता.बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मृत्यु नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे साक्षाळपिंप्री ता. जि. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २८/५/२०२४ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले.
सदर प्रकरणात पुढील तारीख २८/६/२०२४ ही आहे.

**मार्फत** **स्वाक्षरित/-**
**ॲड.मिलींद उबाळे** **तहसिलदार, बीड**



**जाहीर प्रगटन**

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**

जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं.१५२/२०२४
अशोक सखाराम काशिद
विरुद्ध ग्रामपंचायत कार्यालय साक्षाळपिंप्री ता.जि.बीड
पहा
१. अशोक सखाराम काशिद रा.साक्षाळपिंप्री ता.जि.बीड.

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून मयत विठोबा जयराम काशिद यांचा दिनांक १८/०३/१९४१ रोजी मृत्यू झालेला असुन त्यांचे मृत्यूची नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास मृत्यु यांच्या नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास साक्षाळपिंप्री ता.बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मृत्यु नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे साक्षाळपिंप्री ता. जि. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २८/५/२०२४ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले.
सदर प्रकरणात पुढील तारीख --२०२४ ही आहे.

**मार्फत** **स्वाक्षरित/-**
**ॲड.मिलींद उबाळे** **तहसिलदार, बीड**

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
गुरूवार दि.३० मे २०२४
४

# महिला शेतकऱ्याचा मृत्यू झाल्यास मिळणार २ लाख रुपये

केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी विविध योजना राबवल्या जात आहेत. गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजना ही देखील त्यापैकीच एक महत्त्वाकांक्षी योजना आहे. ही योजना महाराष्ट्र राज्य सरकारने सुरू केली असून, या योजनेत नुकताच एक महत्त्वाचा बदल करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. त्यानुसार या योजनेची व्याप्ती वाढवण्यात आली असून, याचा राज्यातील महिला शेतकऱ्यांना मोठा फायदा होणार आहे. राज्य सरकारने महिलांसाठी आतापर्यंत शेकडो योजना सुरू केल्या आहेत. दरम्यान, महिला शेतकऱ्यांना गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजनेत अधिकचे महत्व मिळावे, यासाठी या योजनेमध्ये काही बदल झालेले आहेत. या नवीन बदलानुसार आता महाराष्ट्र राज्यातील शेतकऱ्यांच्या पत्नीचे बाळंतपणात जर मृत्यू झाला तर या महिला शेतकऱ्यांच्या कुटुंबाला दोन लाख रुपयांची मदत देण्याचा मोठा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. सामान्यपणे या योजनेअंतर्गत शेतकरी कुटुंबातील प्रमुख व्यक्तीचा अपघाताने मृत्यू झाला किंवा



अपंगत्व आले. तर या मयत शेतकऱ्याच्या कुटुंबाला आर्थिक मदत दिली जात आहे. मात्र, आता या योजनेची व्याप्ती वाढवण्यात आली असून, महिला शेतकऱ्याचा जर बाळंतपणात मृत्यू झाला तर त्या मयत महिलेच्या कुटुंबाला दोन लाख रुपयांची मदत मिळणार आहे. या योजनेअंतर्गत आर्थिक मदतीचा लाभ मिळवण्यासाठी कृषी विभागाशी संपर्क साधावा लागतो.

कुठे कराल अर्ज : राज्य सरकारच्या या गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजनेचा लाभ घेण्यासाठी अपघात घडल्याच्या ३० दिवसांच्या आत प्रस्ताव सादर करावा लागतो. प्रस्ताव सादर करताना काही महत्त्वाची कागदपत्रे या अपघातग्रस्त शेतकरी कुटुंबाच्या वारसदारांना सादर करावी लागतात. आवश्यक कागदपत्रे घेऊन संबंधित कृषी अधिकारी कार्यालयात याचा सविस्तर असा प्रस्ताव सादर करावा लागतो. प्रस्ताव सादर केल्यानंतर मग सदर अपघात घडलेल्या शेतकरी कुटुंबाच्या वारसांना मदत दिली जाते. कोणती कागदपत्रे लागतात? : या योजनेचा लाभ घेण्यासाठी ७/१२ उतारा, मृत्यूचा दाखला, शेतकऱ्यांचे वारस म्हणून गाव कामगार तलाठ्याकडील गाव नमुना सहा (क) नुसार मंजूर झालेली वारसाची नोंद, शाळा सोडल्याचा दाखला, आधार कार्ड, निवडणूक ओळखपत्र, पोलीस ठाण्यात अपघाताची नोंद झालेला अहवाल (एफआयआर), स्थळ पंचनामा, पोलीस पाटील माहिती अहवाल यांसारखे महत्त्वाची कागदपत्रे सादर करावी लागतात.

## जखराना शेळी देते अधिक करडांना जन्म; शेळीपालनात होईल आर्थिक भरभराट!



राज्यासह देशामध्ये विविध प्रजातीच्या शेळ्या पाळल्या जातात. मात्र, त्या-त्या भागातील विशिष्ट हवामान आणि परिस्थितीनुसार शेतकऱ्यांनी शेळीपालनासाठी योग्य त्या जातीची निवड करणे आवश्यक असते. ज्यामुळे शेतकऱ्यांना शेळीपालन व्यवसायातून आर्थिक उत्पन्न मिळवण्यास मदत होते.

जखराना शेळीचे मूळस्थान : शेळीपालन उद्योगात प्रामुख्याने जखराना शेळीच्या जातीला विशेष महत्व आहे. ही शेळी प्रामुख्याने राजस्थान या राज्यातील अलवर भागात आढळते. या भागात असलेल्या जखराना गावाच्या नावावरून या शेळीला 'जखराना शेळी' असे नाव पडले आहे. हरियाणा राज्यात देखील ही शेळीची जात आढळून येते.

अधिक पिलांना जन्म : शेळीपालन करताना प्रामुख्याने शेळ्या या मांस आणि दूध उत्पादनासाठी पाळल्या जातात. त्यामुळे एखादी शेळीची जात ही एकाच वेळी तीन पिल्लांना जन्म देत असेल. तर अशा प्रजातीच्या शेळीच्या पालनातून शेळीपालन उद्योगात मोठ्या प्रमाणात भरभराट होते. अधिक पिलांना देण्याची ही क्षमता जखराना शेळीमध्ये असल्याने, ती शेळीपालन करणाऱ्या शेतकऱ्यांकडून मोठ्या प्रमाणात मागणी असते.

काय आहेत वैशिष्ट्ये? : जखराना शेळी ही पूर्णतः काळ्या रंगाची शेळी असते. या शेळीची सर्वात मोठी ओळख म्हणजे तिचा असलेला संपूर्णतः काळा रंग होय. मात्र, या जातीच्या शेळीच्या कानावर आणि तोंडावर पांढऱ्या रंगाचे डाग असतात. याशिवाय जखराना शेळीच्या अंगावर अन्य कोणताही डाग तुम्हाला दिसून येणार नाही.

अधिक मांस उत्पादनासाठी प्रभावी : जखराना शेळीच्या बोकडाचे वजन हे ५५ किलो तर शेळीचे वजन हे ४५ असते. बोकडाची उंची ८४ सेमी तर शेळीची उंची ७६ सेमी असते. त्यामुळे ही शेळी मांस उत्पादनासाठी प्रभावी जात मानली जाते. विशेष म्हणजे या शेळीच्या बोकडाला व्यवस्थित खुराक असलेले त्याचे वजन ६० किलोपर्यंत वाढते. किती देते दूध? : जखराना शेळी ही दररोज जवळपास एक ते दीड लीटरपर्यंत दूध देते. या प्रजातीच्या शेळीबाबत केंद्रीय शेळी संशोधन केंद्राने दावा केला आहे की, या प्रजातीची शेळी ही ९० दिवसांच्या काळात १७२ लीटर दूध देते. ही शेळी जवळपास पाच महिने दूध देते. या शेळीची विशेषतः म्हणजे या प्रजातीच्या ६० टक्के शेळ्या या तीन पिलांना जन्म देतात. त्यामुळे अधिक दूध देण्याची क्षमता, अधिक कालावधीपर्यंत दूध देण्याची क्षमता आणि अधिक पिलांना जन्म देण्याची क्षमता अशा तिन्ही क्षमता या प्रजातीच्या शेळीमध्ये आढळून येतात. त्यामुळे शेळीपालनासाठी ही प्रभावी शेळी मानली जाते.

## जनावरांतील चयापचयाचे आजार

दुधाळ गाय,म्हैस व्याल्यानंतर ५ ते ६ दिवसानंतर दूध उत्पादन वाढते. ३ ते ४ आठवड्यात दूध उत्पादनाची उच्च पातळी गाठतात. विण्यापूर्वी २ ते ३ आठवडे आणि व्यायल्यानंतरचे २ ते ३ आठवड्यांचा कालावधी अत्यंत महत्त्वाचा आहे. संक्रमण कालावधी दरम्यान शरिरक्रियात्मक बदलांमुळे चयापचय क्रियांवर ताण आल्यामुळे शरीरातील जीवरसायनांची (ग्लुकोज, कॅल्शिअम आणि मॅग्नेशिअम) पातळी असमतोल होते. यामुळे चयापचय क्रियांसंबधीत आजार दिसतात.

दुग्ध ज्वर : जास्त दूध देत असलेल्या गाई,म्हशींत व्यायल्यानंतर लगेचच हा आजार दिसतो. शरीरातील विभिन्न क्रिया सुरळीत असण्यासाठी कॅल्शिअमची आवश्यकता आहे. व्याल्यानंतर लगेचच चीक दूध आणि नंतर दूध निर्मितीकरिता जास्त मात्रेत शरीरात कॅल्शिअमची गरज असल्याने आणि संक्रमण कालावधीत कमी प्रमाणात शुष्क पदार्थांच्या उपलब्धतेमुळे शरीरातील कॅल्शिअम जलद गतीने कमी होते.

लक्षणे : व्यायल्यानंतर ४८ ते ७२ तासांनी व्यवस्थितपणे उभे राहता येत नाही, मान वर करता येत नाही. हृदयाची स्पंदने वाढतात. मान समोरच्या पायावर



टेकीत डोके मागच्या दिशेने ठेवीत छातीच्या भारावर पहुडलेल्या स्थितीत सुस्त पडून राहातात. शारीरिक तापमान बाह्य वातावरणातील तापमानाशी स्वनियंत्रित करू शकत नसल्याने शारीरिक तापमान कमी होते, गुदद्वार बाहेर येतो, पोट फुगते, लघवी आणि विष्ठेचे उत्सर्जन थांबते, बाहेरील संवेदनांना प्रतिसाद देत नाहीत. आजाराची तीव्रता अधिकच वाढल्यास गाय, म्हैस जमिनीच्या सपाट दिशेत निपचित लोळलेल्या दिसतात आणि डोळ्यांची हालचाल थांबते आणि शारीरिक तापमान ३८ अंश सेल्सिअसपेक्षा कमी होते. निदान : पूर्व इतिहास (व्यायल्याची नोंद), आढळणारी मुख्य लक्षणे (छातीच्या भारावर पहुडलेली स्थिती, मान वर करता न येणे, गुदद्वार बाहेर येणे, लघवी आणि विष्ठेचे उत्सर्जन थांबणे इ.) आणि रक्तातील कमी झालेली कॅल्शिअम पातळीची प्रयोगशाळेत तपासणी करून आजाराचे योग्य निदान करता येते. उपचार : आजाराची लक्षणे तपासून तातडीने पशू तज्ज्ञांच्याकडून उपचार करावेत. व्यायल्यानंतर जास्त दूध उत्पादन असलेल्या गाई,म्हशीत आजाराची दाट शक्यता असल्याने विण्याच्या ३ आठवड्यांपूर्वीपासून कमी प्रमाणात कॅल्शिअम व पोटॅशिअम असलेले खाद्य द्यावे. व्याल्यानंतर १ टक्के कॅल्शिअम व ०.३० ते ०.४५ टक्के मॅग्नेशिअम (शुष्क पदार्थ आधारित) खाद्यातून पुरवावे. व्यायल्यानंतर जीवनसत्त्व डी चे इंजेक्शन ३ दिवस दिल्यास आजारास प्रतिबंध करता येऊ शकते. गाय-म्हैस व्याल्यानंतर दुग्ध ज्वर विकारास प्रतिबंध करण्यासाठी घरगुती उपाययोजना म्हणजे, मातीच्या मडक्यात २० लिटर पाण्यात १ किलो चुना रात्रभर भिजत ठेवावा. २०० मिलि वरची चुन्याची निवळी २०० मिलि ताज्या पाण्यात मिसळून व्यायलेल्या जनावरांना रोज पाजावी. दर २० दिवसांनी नवीन चुन्याचे मिश्रण तयार करावे. दुधाळ गाय-म्हशीला दररोज २० ते २५ ग्रॅम मॅग्नेशिअमची आवश्यकता असते. पिण्याच्या पाण्यातून तज्ज्ञांच्या सल्याने मॅग्नेशिअम किंवा खनिज मिश्रण असलेल्या विटातून नियमितपणे मॅग्नेशिअम पुरविणे गरजेचे आहे.

## हळदीला झळाळी, भाव गेला १८ हजारांपार!

नांदेड : आवक कमी झाल्याने हळदीच्या भावात उसळी आलेली आहे. गेल्या काही दिवसांपासून नांदेड येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मार्केट यार्डातील हळदीची आवक आता कमी होऊ लागली आहे. त्यामुळे हळदीच्या दराने उच्चांकी घेतली असून, लिलाव बाजारात हळदीला १८ हजार १०० रुपये प्रति क्विंटल भाव मिळाला आहे.

मागील महिन्यात आवक मोठ्या प्रमाणात वाढली होती. दररोज चार ते पाच हजार पोते हळदीची आवक व्हायची. पण, आता शेतकऱ्यांकडील हळद जवळपास ७० ते ८० टक्के थेट बाजारात विक्री करण्यात आली आहे. त्यामुळे हळदीची आवक आता कमी झाल्याने दराने उसळी घेतली आहे. मागील महिन्यात हळदीचे भाव १६ हजारावर



स्थिरावले होते. मात्र, मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात सोमवारी झालेल्या लिलाव बाजारात कमीत कमी १५ हजार ६०० रुपये, तर जास्तीत जास्त १८ हजार १०० रूपयांचा भाव मिळाला, तर सरासरी १६ हजार ८०० रूपयांपर्यंत हळदीची विक्री झाली आहे. येत्या काही दिवसांत हळदीचे दर वाढतील, या आशेने काही मोठ्या शेतकर्यांनी हळद साठवून ठेवली होती त्याचा या शेतकऱ्यांना फायदा झाला.

हिंगोलीत कसा मिळतोय भाव?

हिंगोली येथील बाजार समितीच्या मार्केट यार्डात तीन हजार क्विंटल हळदीची आवक झाली. या हळदीला सरासरी १६ हजार ४०० रूपयांचा भाव मिळाला. दरम्यान, गत आठवड्याच्या तुलनेत पाचशे रूपयांनी भाव वधारल्याने शेतकर्यांना दिलासा मिळाला. २७ मे रोजी २ हजार ८२५ क्विंटल हळदीची आवक झाली होती. १५ हजार ३०० ते १७ हजार ५०० रुपया दरम्यान भाव मिळाला. तर सरासरी १६ हजार ४०० रुपये भाव मिळाला.

## सेंद्रिय खतांद्वारे कृषी उत्पादनात वाढ; जाणून घ्या खासियत

सेंद्रिय शेती ही शेतीची जुनी पद्धत आहे ज्यामध्ये नैसर्गिक संसाधनांचा वापर करून सेंद्रिय खते तयार केली जातात. यामध्ये केवळ शेतीतून उत्पादित केलेले पदार्थ, जे अन्नधान्य म्हणून वापरले जात नाहीत, ते निसर्गाप्रमाणे सोप्या पद्धतीचा वापर करून कंपोस्ट म्हणून तयार केले जातात. अनादी काळापासून या संदर्भात गावात एक म्हण प्रचलित आहे. गांडुळे हे शेतकऱ्याचे मित्र आहेत. शेतीची सुपीकता वाढवण्यासाठी गांडुळे जी मदत करतात ती सामान्य यांत्रिक पद्धतीने करता येत नाही, हे सध्या कृषी शास्त्रज्ञांनी सिद्ध केले आहे. आफ्रिकन नाईट क्रॉलर, गांडुळांची एक प्रजाती, एका तासात १०० वेळा भूगर्भात फिरते. या प्रक्रियेद्वारे जमिनीची सुपीकता मुबलक प्रमाणात वाढते.

गांडुळे जमिनीची सुपीकता वाढवतात : गांडुळांपासून सेंद्रिय खताची निर्मिती हे सध्याच्या शतकातील योगदान आहे ज्यामध्ये या जीवाचा उत्प्रेरक म्हणून वापर केला जातो. गांडुळांच्या अनेक प्रजाती उपलब्ध असल्या तरी सेंद्रिय खत बनवण्यासाठी आफ्रिकन नाईट क्रॉलर सर्वोत्तम आहे. हे ६ ते ७ इंच लांबीचे काळ्या रंगाचे गांडूळ आहे जे लहान आहे आणि रंगात भिन्न आहे. त्याचे पुनरुत्पादन अतिशय सोपे आणि सुलभ आहे. शास्त्रोक्त पद्धतीने तयार केलेल्या खड्ड्यात तयार



केलेल्या लहान गांडुळांमध्ये त्याची अंडी ठेवून प्रथमच पुनरुत्पादन केले जाते. साधारणपणे २० ते ३० सेंटीग्रेड तापमान या गांडुळासाठी योग्य असते. पण ते २ ते ४ सेंटीग्रेड तापमानातही तग धरू शकते. त्याच्या पुनरुत्पादनात कच्चे शेण काळ्या मातीत राहते आणि उन्हाळ्यात वेळेवर पाणी शिंपडणे फायदेशीर ठरते.

शेणखत : तलावातील जलकुंभाची तणांची पाने नैसर्गिक अवस्थेत कापून त्यांचे लहान तुकडे करून वाळवा. नंतर गरजेनुसार, म्हणजे ८ बाय ६ बाय ४ आकाराचा खड्डा बनवून, ज्यामध्ये पृष्ठभाग घन असणे आवश्यक आहे, त्याच्या खालच्या थरात शेणखत मिसळून शेणखताचा पृष्ठभाग तयार करावा. नंतर खड्ड्यात लहान हायसिंथची पाने टाका, वरपर्यंत खड्डा भरून त्यावर काळ्या मातीचा पृष्ठभाग तयार करा, त्यात शेणही मिसळले तर चांगले होईल. या मिश्रणात एक ते दीड किलो कासव टाका, नंतर खड्डा शेणाने झाकून टाका. हा खड्डा ५० ते ६० दिवस असाच राहू द्या. उन्हाळ्यात दोन ते तीन वेळा पाण्याची फवारणी करावी. पावसाळ्यात मुसळधार पावसापासून खड्डा सुरक्षित ठेवण्यासाठी तो खरपूस किंवा ताडपत्रीने झाकून ठेवा.

जेव्हा गांडुळ कंपोस्ट तयार केले जाते, म्हणजेच पाण्यातील हायसिंथचे रूपांतर सेंद्रिय खतामध्ये होते, तेव्हा गांडुळे खड्ड्याच्या पृष्ठभागावर येतात आणि कंपोस्ट खताचा रंग हलका तपकिरी होतो. हे खत मिश्रण खड्ड्यातून बाहेर काढा आणि हलक्या सूर्यप्रकाशात बाहेर वाळवा. खत तयार करून व्यावसायिक स्तरावर विकायचे असेल तर ते गाळून १-२ सेमी चाळणीत वाळवून लहान-मोठ्या पोत्यात भरता येते.

गांडुळे चाळणीत जमा झाल्यास त्यांचा पुरेपूर उपयोग करता येतो. येथे हे स्पष्ट करणे आवश्यक आहे की जर गांडुळाचे खत एका चहाच्या पानाच्या आकारात १ सेंटीमीटर असेल तर ते पूर्णपणे कोरडे करा आणि ओल्या खतामुळे ते कुजू शकते. उरलेले खत पूर्णपणे वापरता येते. जर तुम्हाला तुमच्या शेतात हे खत वापरायचे असेल तर ते थेट शेतात टाकता येते.

# दिन विशेष

## महत्वाच्या घटना

१४३१: फ्रांसच्या रुआ शहरात जोन ऑफ आर्कला जाळून मृत्यूदंड.
१४९८: इटालियन सागरी खलासी कोलंबस आपल्या सहा जहाजांसोबत अमेरिकेच्या प्रवासाला निघाले.
१५५६: अकबराचा मुलगा सलीम व राणा प्रताप यांच्यामध्ये हळदीघाट येथे घनघोर लढाई झाली.
१५७४: हेन्री (तिसरा) फ्रान्सचा राजा बनला.
१६३५: प्रागचा तह.
१६३१: पहिले फ्रेंच वृत्तपत्र गॅझेट डी फ्रान्सचे प्रकाशन झाले.
१८१४: पॅरिसचा पहिला तह नेपोलियन बोनापार्टला एल्बा येथे हद्दपारीची शिक्षा.
१८६६: मुस्लीम धर्मीय विद्वान मुहम्मद क़ासिम नानोत्वी यांनी उत्तरप्रदेश मधील देवबंद या ठिकाणी आशिया खंडातील सर्वात मोठ्या समजल्या जाणाऱ्या मदरस्याची स्थापना केली.
१९२२: अमेरिकेतील वॉशिंगटन डीसी मध्ये लिंकन यांच्या स्मारकाचा जीर्णोद्धार करण्यात आला.
१९३४: मुंबई नभोवाणी केंद्राची सुरुवात.
१९४२: दुसरे महायुद्ध इंग्लंडच्या १००० विमानांनी जर्मनीतील कोलोन शहरावर तुफानी बॉम्बहल्ला केला.
१९७४: एअरबस ए-३०० विमानांची सेवा सुरू झाली.
१९७५: युरोपियन स्पेस एजंसीची स्थापना झाली.
१९८७: गोवा हे भारतातील २५ वे घटकराज्य मान्य करण्यात आले. गोव्याला भारतातील २६ वे घटक राज्य म्हणून मान्यता मिळाली. ३० मे १९८७ रोजी गोव्याला राज्याचा दर्जा देण्यात आल्याने ३० मे हा दिवस गोवा राज्य स्थापना दिन म्हणून साजरा केला जातो.
१९९३: पु. ल. देशपांडे यांना त्रिदल' संस्थेच्या वतीने पुण्यभूषण पुरस्कार प्रदान.
१९९८: अफगाणिस्तानमध्ये रिश्टर मापनपद्धतीनुसार ६.६ तीव्रतेचा भूकंप. ५,००० ठार.
२०१२: भारतीय बुद्धिबळपटू विश्वनाथन आनंद यांनी पाचव्यांदा विश्व बुद्धिबळ पटू होण्याचा मान पटकावला.

## जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१०१०: रेनझाँग, चिनी सम्राट.
१६७२: पीटर द ग्रेट, रशियाचा झार.
१८९४: डॉ. पांडुरंग सखाराम पिसुर्लेकर (इतिहासकार).
१८७९: कॉलिन ब्लाइथ, इंग्लिश क्रिकेट खेळाडू.
१८९५: मॉरिस टेट, इंग्लिश क्रिकेट खेळाडू.
१९०६: प्रसिद्ध भारतीय चित्रपट गीतकार, सर्वोत्कृष्ट पटकथा आणि कथा लेखक पंडित मुखराम शर्मा यांचा जन्मदिन.
१९०९: जॉर्ज हेडली (वेस्ट ईंडीझचे क्रिकेट खेळाडू).
१९१६: दीनानाथ दलाल (३० मे १९१६ १५ जानेवारी १९७१)दीनानाथ दलाल हे वाङ्मयीन पुस्तकांतील बोधचित्रांकरता, मुखपृष्ठांकरता ख्यातनाम झालेले मराठी चित्रकार होते. यांचे मूळ नाव नृसिंह दामोदर दलाल-नाईक होते परंतु पुढे दीनानाथ दलाल या नावाने ते प्रसिद्धीस आले.
१९४०: भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे माजी अध्यक्ष तसचं, बंगाल क्रिकेट असोसिएशन चे माजी अध्यक्ष आणि आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेचे माजी अध्यक्ष जगमोहन दालमिया यांचा जन्मदिन.
१९४९: इंग्लिश जलदगती गोलंदाज बॉब विलीस यांचा जन्म.
१९५०: परेश रावल (भारतीय अभिनेते).
१९५२: भारतीय औषध शास्त्रज्ञ, संगीतशास्त्रज्ञ, हार्मोनियम वादक आणि ज्योतिषशास्त्र सल्लागार विद्याधर ओक यांचा जन्मदिन.
**१९५५:** प्रसिद्ध भारतीय हिंदी चित्रपट अभिनेते, विनोदकार आणि राजकारणी तसचं, भारतीय लोकसभेचे माजी सदस्य परेश रावल यांचा जन्मदिन.
१९५६: भारतीय वंशीय अमेरिकन जैविक अभियंता, साहित्य वैज्ञानिक आणि शैक्षणिक प्रशासक सुब्रा सुरेश यांचा जन्मदिन.
१९६४: भारतीय सेवानिवृत्त क्रिकेट पंच के. एन. राघवन यांचा जन्मदिन.
१९८०: देवेन्द्र बार्नहार्ट (अमेरिकन संगीतकार).

## मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८१४: नेपोलियन बोनापार्ट यांची पहिली पत्नी जोसेफिन डी बीअर्नार्नास यांचे निधन. (जन्म: २३ जून १७६३)
१८२९: विद्युत पृथक्करणाद्वारे सोडिअम आणि पोटॅशिअम ही मूलद्रव्ये प्रथमच वेगळी करणारे इंग्लिश भौतिक व रसायनशास्त्रज्ञ सर हंफ्रे डेव्ही यांचे निधन. (जन्म: १७ डिसेंबर १७७८)
१८९२: बहाई पंथाचे संस्थापक बहाउल्ला यांचे निधन. (जन्म: १२ नोव्हेंबर १८१७ तेहरान, इराण)
१९३३: भारतीय स्वातंत्र्य सेनानी, पत्रकार आणि संघटन कर्ता लोकराम नयनराम शर्मा यांचे निधन.
१९५४: व्हिक्टोरिया क्रॉस पुरस्कार प्राप्त ब्रिटीश सैन्य दलाचे थोर सैनिक फ्रेडरिक विल्यम हेजेस यांचे निधन.
१९७१: प्रख्यात भारतीय चित्रपट अभिनेते पृथ्वीराज कपूर यांचे निधन.
१९७२: पृथ्वीराज कपूर, हिंदी चित्रपटअभिनेता. (जन्म: ३ नोव्हेंबर १९०१)
१९७७: भाषाशास्त्रज्ञ सुनीतिकुमार चटर्जी यांचे निधन (भाषाशास्त्रज्ञ, साहित्य व संस्कृतीचे अध्यापक) (जन्म: २६ नोव्हेंबर १८९०)
१९८७: चौधरी चरण सिंग, लोकदलाचे संस्थापक, भारताचे ५ वे पंतप्रधान. (जन्म: २३ डिसेंबर १९०२)
२००७: महाराष्ट्र राज्य लता मंगेशकर पुरस्कार विजेते प्रसिद्ध भारतीय हिंदी व मराठी चित्रपट संगीतकार स्नेहल भटकर यांचे निधन. (जन्म: १७ जुलै १९१९)
२०१०: समाजवादी विचारवंत, स्वातंत्र्यसैनिक ग. प्र. प्रधान यांचे निधन. (जन्म: २६ ऑगस्ट १९२२)
२०२०: अजित जोगी (छत्तीसगढचे पहिले मुख्यमंत्री).

## थोडक्यात

### खोलेश्वर विद्यालयाची यशस्वी निकालाची परंपरा

दिंद्रुड । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील खोलेश्वर विद्यालयाची यशस्वी निकालाची परंपरा कायम महाराष्ट्र शालांत परीक्षेचा निकाल सोमवारी लागला यात सर्व विद्यार्थी परीक्षेत यश संपादन करत उत्तीर्ण झाले, प्रथम क्रमांक काटूळे तनुजा सूर्यकांत ९७.००%, द्वितीय क्रमांक आंधळे सार्थक लक्ष्मण ९६.२०%, तृतीय क्रमांक राठोड सुमित गणेश ९५.६०%, कोल्हे प्रथमेश सत्यप्रेम ९५.६०%, शिंदे प्रथमेश दत्तराव ९५.६०% उल्लेखनीय बाब तब्बल ५७ विद्यार्थी ९०% पेक्षा जास्त गुणांनी उत्तीर्ण यशस्वी विद्यार्थ्यांचे खोलेश्वर विद्यालयाचे अध्यक्ष दिलीपराव पारेकर, खोलेश्वर विद्यालयाचे सचिव विलासजी पारेकर साहेब, प्राचार्य सरिता फपाळ , मुख्याध्यापक संजय रायते , रोहिणी पारेकर, सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून पुढील शिक्षणासाठी उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

### माळी समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्काराचे आयोजन

बीड । प्रतिनिधी

येथील श्री संत सावता महाराज मंदिर ट्रस्ट च्या वतीने माळी समाजातील इयत्ता दहावी,बारावी आणि अन्य स्पर्धा परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले आहे.सदर कार्यक्रमास माळी समाजातील विद्यार्थी आणि नागरिकांनी बहुसंख्येने उपस्थित राहण्याची विनंती ट्रस्टच्या वतीने करण्यात आली आहे. प्रसिद्ध दिलेल्या पत्रका अधिक माहिती अशी की दिनांक २जून (रविवार)रोजी सकाळी ठीक १० वाजता बीड येथील श्री सावता माळी चौकाच्या( मोंढा रोड) शेजारील नियोजित श्री संत सावता महाराज मंदिर येथील भव्य सामाजिक सभागृहात समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचे सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.७५% पेक्षा अधिक गुण प्राप्त असणाऱ्या विद्यार्थ्यांनी रविवारी सकाळी नऊ वाजेपर्यंत श्री गुंजाळ सर ९६ ६५ ८१ ५१ ३८ किंवा श्री घाडगे सर ९४ २२ २४ ४६ ४५ यांच्याशी संपर्क साधून नोंदणी करावी असे आवाहन शेवटी पत्रकातकरण्यात आले आहे.

### स्वामी विवेकानंदच्या विद्यार्थ्यांनी मिळवले यश

अंबाजोगाई । प्रतिनिधी

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ च्या मार्च महिन्यात घेण्यात आलेल्या दहावी बोर्ड परीक्षेत स्वामी विवेकानंद बाल विद्यामंदिर शाळेच्या तब्बल २२ विद्यार्थ्यांनी विजयी घोडदौड करून शंभर टक्के निकालाची यशस्वी उज्वल परंपरा कायम राखली आहे. समाधान जाधव व आयुष बिडगर या दोन विद्यार्थ्यांनी १०० पैकी १०० %गुण घेऊन शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. शाळेतील एकूण २२ विद्यार्थी विशेष योग्यता प्राप्त विद्यार्थी २० प्रथम श्रेणी प्राप्त विद्यार्थी २ ८०% पेक्षा अधिक गुण मिळवणारे विद्यार्थी १७ अमित रामलिंग घुले ९७.६०%, अनुप्रिता राहुल देशमुख ९६.४०%, पवन नवनाथ भोजने ९५.४०%, श्रद्धा विष्णुकांत बागवाले ९४.४०% , रुद्र मुकुंद कुमठेकर ९२% कु.कांचन कल्याण काळे ९२% , मयुरेश ओमप्रकाश कुलकर्णी ९०%, राजवीर लोमटे ९०.२०%, पार्थ शिंदे ८७.२०% , अजय फड ८५%, देशमुख सई ८५%, नोमन शेख ८४%, ओम आपेट ८३% , पुष्कर क्षीरसागर ८०.८०% , प्रणव आपेट ८०.२०%, अभिजित गिरी ७९.२०%, चैतन्य टोले, रितेश गाढवे, अवधूत देशमुख, प्रणव उदावंत अथर्व लोढा या विद्यार्थ्यांनी ही घवघवीत यश संपादन केले आहे. संस्थेचे सन्माननीय संतोष दादा कुलकर्णी संस्थेच्या सचिव तथा माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापिका स्वरूपा दिग्रसकर व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या सुरेखा, प्रज्ञा, निशिगंधा, बालिका मुंडे, पूजा गरड, काळे , व्यंकटेश गायकवाड या सर्वांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे. त्यांच्या या यशासाठी त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे

### योगेश्वरी महाविद्यालयात प्रवेश प्रक्रियेस प्रारंभ

अंबाजोगाई । प्रतिनिधी

योगेश्वरी शिक्षण संस्था संचलित योगेश्वरी महाविद्यालयात (शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५) करिता इयत्ता अकरावी विज्ञान वर्गांसाठी प्रवेश नोंदणी प्रक्रिया मंगळवार २८ मे ते गुरुवार १३ जुन२०२४ या कालावधीत दुपारी पाच वाजेपर्यंत सुरू राहणार असल्याची महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम.व्ही.कानेटकर यांनी दिली. दिलेल्या परिपत्रकात नमुद करण्यात आले आहे की, दि. १४ व १५ जुन २०२४ रोजी सायंकाळी पाच वाजेपर्यंत प्रवेशा साठीआलेल्या अर्जातील माहिती पडताळणी करण्यात येईल गुणवत्ता व आरक्षणा नुसार प्रथम १) प्रवेश यादी दि १८ जुन रोजी सकाळी ११:०० वा. सूचना फलकावर लावण्यात येईल प्रथम यादी प्रवेश प्रक्रिया १८ जुन ते २० जुन दुपारी पाच वाजे पर्यंत होईल त्यानंतर गरजेनुसार दुसरी व तिसरी प्रवेश यादी अनुक्रमे २१ जुन व २५ जुन रोजी सकाळी अकरा वाजता फलकावर लावण्यात येईल. प्रवेशासाठी जागा शिल्लक असल्यास स्पॉट राऊंड प्रवेश प्रक्रिया दि.२८ जुन सायंकाळी पाच वाजे पर्यंत असेल विना अनुदानित तुकड्यां साठीची प्रवेश प्रक्रिया दि.२९ जुन ते ०१ जुलै सांयकाळी पाच वाजेपर्यंत असणार आहे महाविदयालयाचे इयत्ता अकरावीचे नियमित वर्ग ०३ जुलै रोजी सकाळी ११:३० वा. सुरू होतील याची नोंद संबंधित पालक व विद्यार्थी यांनी घ्यावी असे महाविद्यालय प्रशासनाच्या वतीने कळविण्यात आले आहे.

# भर उन्हाळ्यात खंडित होत असलेला विद्युत पुरवठा सुरळीत करण्याची निवेदनाद्वारे मागणी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

संपूर्ण मे महिना अंबाजोगाई शहर उष्माघाताने होरपळून निघत आहे.अशा उकड्याच्या तसेच उष्माघाताच्या दिवसात महावितरण विभागाकडून दिवसातून पाच ते सहा तास वीजपुरवठा खंडित केला जात आहे. विद्यत पुरवठा खंडित झाल्याने गर्मी व उकड्यामुळे लहान मुले , वयोवृद्ध नागरीक अक्षरशः हैराण व त्रस्त होत आहेत. त्यांना नाहक त्रास सोसावा लागत आहे. ऐन उकाड्यात सतत खंडित केला जात असलेला विद्युत पुरवठा अखंडित पणे सुरळीत चालू ठेवावा अशी मागणी अंबाजोगाई शहरातील राजकिशोर मोदी मित्र मंडळ व समस्त अंबाजोगाई करांच्या वतीने मुख्य कार्यकारी अभियंता महावितरण यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे. या निवेदनावर राजकिशोर मोदी मित्र मंडळाच्या अनेक सदस्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.



मागील काही दिवसापासून अंबाजोगाई शहरात शहर विकासाच्या नावाखाली रस्त्याची कामे चालू आहेत. ही कामे पावसाळा तोंडावर आला तरी देखील अतिशय कासव गतीने सुरू आहेत. रस्ता रुंदीकरण करताना रस्त्याच्या दुतर्फा नवीन विद्युत खांब लावण्यात येत आहेत. या नवीन खांबावर नवीन लाईन ओढण्याच्या नावाखाली शहरात दररोज सहा सहा तास विद्युत पुरवठा खंडित केला जात आहे. सततच्या खंडीत विदयुत पुरवठयामुळे नागरीक हैरान व त्रस्त झाले आहेत. सध्या प्रचंड उन्हाळाचे दिवस असून तीव्र उष्णतेमुळे वयोवृद्ध नागरीक व लहान मुले हताष झाले आहेत. शहरात दिवसातून पाच ते सहा तास विदयुत पुरवठा खंडीत केला जात आहे. याचा परिणाम पाणी पुरवढ्यावर देखील होत आहे. लाईटबाबत विचारणा केली असता त्यांच्या कर्मचा-यांकडून कसलाही प्रतिसाद दिला जात नाही. महावितरणाकडून विविध कारणे देवून सतत विदयुत पुरवठा खंडीत केला जात आहे. यावरून शहरात महावितरण व विज कर्मचा-यांचा मनमानी कारभार सुरू असल्याचे अंबाजोगाई शहरात चर्चिले जात आहे.

तेव्हा मुख्य कार्यकारी अभियंता महावितरण साहेबानी याकडे गांभीर्याने पाहुन शहरवासियांना कशाप्रकारे दिलासा मिळेल व विद्युत पुरवठा सतत अखंडित पणे व सुरळीत सुरू ठेवला जाईल याकडे लक्ष दयावे अशी विनंती समस्त अंबाजोगाई करांच्या वतीने एका जाहीर निवेदनाद्वारे केली आहे. विस्कळीत झालेली विद्युत वितरण व्यवस्था तात्काळ सुरळीत व नियमित न झाल्यास अंबाजोगाई करांना रस्त्यावर उतरावे लागेल असा इशारा देखील राजकिशोर मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली देण्यात आलेल्या निवेदन प्रसंगी देण्यात आला. सदरील निवेदन महावितरण कार्यालयात देतांना माजी उपनगराध्यक्ष मनोज लखेरा,बबन लोमटे, महादेव आदमाणे,तानाजी देशमुख, दिनेश भराडीया, धम्मा सरवदे, सुनील व्यवहारे, अकबर पठाण,दत्ता सरवदे,सचिन जाधव, रफिक गवळी, आकाश कऱ्हाड, वजीर शेख,मतीन जरगर, शुभम लखेरा, जमादार पठाण, अस्लम शेख, संतोष चिमणे, भारत जोगदंड, शरद काळे, महेश वेडे, आशीष ढेले याच्यासह अनेकजण उपस्थित होते.

## स्व.सुनील लोमटे हे जनसामान्यांचा आधार होते - न्या. पाटील

अंबाजोगाई । प्रतिनिधी

प्रतिनिधी स्व.लोकनेते सुनील लोमटे यांनी आपल्या कार्यातून स्वतःचे नेतृत्व सिद्ध केले.सामान्य माणसाच्या वेदना ओळखून त्यांना संवेदशीलतेने मदतीचा हात दिला. त्यांना सामाजिक न्याय व पाठबळ दिले. ही जाणीव आजही समाजमनात कायम आहे. असे प्रतिपादन सेवानिवृत्त न्यायधिश वसंतराव पाटील यांनी केले. येथील आद्यकवी मुकुंदराज सांस्कृतिक सभागृहात लोकनेते सुनिलकाका लोमटे सामाजिक प्रतिष्ठान, अंबाजोगाई यांच्या वतीने ''सामान्यांचा नवाब सुनिलकाका'' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून न्या.पाटील बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सामाजिक कार्यकर्ते दाजीसाहेब लोमटे होते. तर व्यासपीठावर माजी आमदार संजय दौंड,शिवसेनेचे जिल्हाप्रमुख सचिन मुळुक, विठ्ठल सहकारी कारखान्याचे संचालक अभिजित पाटील,प्रसिद्ध कवियत्री विमल माळी, प्रा.सतीश पत्की, अॅड. सयद शेख, गिरीधारीलाल भराडिया,बबन लोमटे, उपस्थित होते.

या वेळी बोलताना न्या. पाटील म्हणाले की




स्व. सुनील लोमटे यांनी आपल्या कार्यातून सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्ती समोर आपल्या पुस्तकातून नवा आदर्श ठेवला आहे. एका व्यक्तीच्या निधनानंतर ही लोक त्यांच्या कार्याला विसरत नाहीत. त्यांचे कार्य या पुस्तकातून प्रेरणा देत राहील. असे सांगून स्व. सुनील लोमटे यांच्या अनेक आठवणींना त्यांनी उजाळा दिला. यावेळी संजय दौंड,सतीश पत्की,विमल माळी,अॅड.सयद, सचिन मुळुक,अभिजित पाटील यांनी आपल्या सुनील लोमटे यांच्या सोबतच्या आठवणींना उजाळा दिला. या वेळी आपल्या प्रास्ताविकात शोभा लोमटे यांनी या पुस्तकाद्वारे आठवणींना उजाळा दिला असल्याचे सांगितले. सुनीलकाका यांच्या निधनानंतर जनसामान्यांनी ज्या भावना व्यक्त केल्या.त्याच या पुस्तकात शब्दबद्ध करण्याचा प्रयत्न केल्याचे सांगितले. या वेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते ''सामान्यांचा नवाब सुनिलकाका'' या पुस्तकाचे प्रकाशन झाले. या कार्यक्रमाचे संचलन प्रकाश बोरगावकर यांनी केले तर उपस्थितांचे आभार ऋषिकेश लोमटे यांनी मानले. या कार्यक्रमास महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी लोकनेते सुनिलकाका लोमटे सामाजिक प्रतिष्ठान, अंबाजोगाई च्या पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.

## अहिल्यादेवी होळकर जयंती शासकीय कार्यालयात साजरी करा

### वाघमोडे अंकुश गवळी यांचे आवाहन

बीड । प्रतिनिधी



पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची जयंती ३१.मे रोजी संपूर्ण देशभरात मोठ्या प्रमाणात उत्साहात साजरी करण्यात शासनाच्या वतीने अनेक जयंतीच्या शासकीय सुट्ट्या दिल्या गेल्या आहेत. या सुट्टीच्या औचित्य साधून समाजातील अनेक घटकांनी जयंती उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा करण्यासाठी पुरेसा वेळ मिळतो महापुरुषांच्या त्यांनी केलेल्या त्यागाचा व त्यांच्या विचारांच्या आत्मसमान करतात दिनांक ३१ मे रोजी पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त महाराष्ट्रात शासकीय सुट्टी जाहीर करण्यात यावी देशभरातील सर्व शासकीय कार्यालयात गाव वाडी वस्तीवर राजमाता पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी करून त्यांच्या विचाराचा वसा सर्वसामान्य माणसापर्यंत गेला पाहिजे असे आव्हान युवा नेते अमर वाघमोडे युवा पत्रकार अंकुश गवळी यांनी केले आहे,

## रामराजे फड, माधव मुंडे यांना राज्यस्तरीय गरुडझेप पुरस्कार

परळी । प्रतिनिधी

शिक्षण सम्राट अध्यक्ष : स्वामी विवेकानंद प्रतिष्ठान गंगाखेड रामराजे फड खादगावकर व दयाधर्म सामाजिक प्रतिष्ठान हाळम, तथा हाळम फेस्टिवलचे अध्यक्ष, जिल्हा सरचिटणीस राष्ट्रवादी युवक काँग्रेस माधव मुंडे यांना सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, धार्मिक क्षेत्रातील कामाची दखल घेऊन ईगल फाउंडेशनचा राज्यस्तरीय गरुड झेप पुरस्कार २०२४ जाहीर करण्यात आला आहे. हा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.ईगल फाउंडेशन च्या वर्धापन दिनानिमित्त दिनांक ९ जून २०२४ रोजी मा.डॉ. अण्णासाहेब डांगे शैक्षणिक संकुल आष्टा तालुका वाळवा जिल्हा सांगली येथे सकाळी १०.३० वाजता विशेष गुणगौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यात रामराजे फड खादगावकर व माधव मुंडे याना राज्यस्तरीय गरुड झेप पुरस्कार २०२४ देऊन मान्यवरांच्या उपस्थितीत गौरविण्यात येणार आहे. या पुरस्काराचे स्वरूप सन्मानपत्र ट्रॉफी शाल श्रीफळ व असे आहे. हा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल खादगावकर व मुंडे यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## पाचशे लाभार्थ्यांची मोफत नेत्र तपासणी व चष्मे वाटप

### पन्नास हजार लाभार्थ्यांना चष्मे वाटप करण्याचा संकल्प - डॉ. ओमप्रकाश शेटे

दिंद्रुड । प्रतिनिधी

येथील ज्येष्ठ व्यापारी तथा देवदूत डॉ.ओमप्रकाश शेटे यांचे वडील कै.सदाशिवअण्णा शेटे यांच्या तृतीय पुण्यस्मरणार्थ मोफत नेत्र तपासणी व चष्मे वाटप शिबिर घेण्यात आले. शिबिरात पाचशेवर लाभार्थी सहभागी झाल्याने उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यात महिला रुग्णांची उपस्थिती लक्षणीय होती. मोफत चष्मा वाटपाचा हा उपक्रम आपण निरंतर चालू ठेवणार असून वेगवेगळ्या माध्यमातून ५० हजार लाभार्थ्यांना मोफत चष्मे वाटप करण्याचा संकल्प केला असल्याचे डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी सांगितले. माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथे मंगळवार दिनांक २८ मे २०२४ रोजी या शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. कै.सदाशिवअण्णा शेटे यांच्या पुण्यतिथी निमित्त देवदूत प्रतिष्ठानच्या वतीने प्रत्येक वर्षी आरोग्य तपासणी, औषधी वाटप,



रक्तदान शिबिर या सारखे लोकोपयोगी उपक्रम राबविले जातात. यंदा मोफत नेत्र तपासणी व चष्मे वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. आजच्या शिबिरासाठी माजलगाव, धारूर, वडवणी तालुक्यातील रुग्ण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कै. सदाशिवआण्णा शेटे यांच्या प्रतिमेचे पूजन करून सकाळी दहा वाजता शिबीरास सुरुवात करण्यात आली. दिवसभरात पार पडलेल्या मोफत नेत्र तपासणी व चष्मे वाटप शिबिरात दिंद्रुड पंचक्रोशीतील अनेक गावातील गरजू, वंचित, विधवा, मजुर महिलांसह आबालवृद्धांनी सहभाग नोंदविला. सायंकाळी ७ वाजे पर्यंत रुग्णांची तपासणी सुरु होती. दिवसभरात ५०७ रुग्णांची तपासणी करून ४२५ रूग्णांना तात्काळ मोफत चष्मे वाटप करण्यात आले. तर १०० पेक्षा जास्त रुग्णांवर खाजगी दवाखान्यात मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. शिबिराच्या यशस्वीतेसाठी नेत्रतज्ञ डॉ. जालिंदर चेंडके, डॉ.रामराज सोळंके, देवदूत प्रतिष्ठानचे अध्यक्ष बंडूजी खांडेकर, अतुल चव्हाण, नागेश कानडे, बबलू काशीद, गणेश काटकर, ओंकार काटकर, बालासाहेब काचगुंडे, संतोष मुंडे, नवनाथ कांबळे, नागेश वकरे, सुनील काटकर, एकनाथ हंगरगे,राहुल काऊत, राम देशमाने, ज्ञानेश्वर ठोंबरे आदी सहकाऱ्यांनी परिश्रम घेतले. दृष्टिदानाचा हा यज्ञ एवढ्यावरच थांबणार नाही तर माजलगाव, धारूर व वडवणी तालुक्यातील प्रत्येक मोठ्या गावात, सर्कल निहाय मोफत नेत्र तपासणी व चष्मे वाटप शिबिरे घेवून गरजवंताना दृष्टी दान करण्याचा आपला संकल्प असल्याचे प्रतिपादन आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे प्रमुख डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी यावेळी बोलताना केले.

## योग समितीच्या ७५ शिबिरांतून ४५ हजार विद्यार्थ्यांना मोफत योगाचे धडे

अंबाजोगाई । प्रतिनिधी

सामाजिक बांधिलकी जोपासत शहर व तालुक्यातील विविध शाळा तसेच महाविद्यालयातून तब्बल ४५ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना मागील १० महिन्यांपासून योगाचे मोफत धडे देण्याचे काम माजी सैनिक योग प्रशिक्षक दत्ता सदाशिव लांब यांनी केले आहे. त्यांच्या ७५ व्या हिरक महोत्सवी योग विज्ञान शिबिराच्या सांगता समारोहाचे आयोजन मंगळवारी लोखंडी सावरगाव येथे करण्यात आले होते.

पतंजलि योग समितीचे मुख्य योग प्रशिक्षक माजी सैनिक आयुर्वेदिक चिकित्सक दत्ता लांब यांनी मागील १० महिन्यांहून अधिक काळ तब्बल ७५ निःशुल्क योग शिबिरांचे आयोजन केले आहे. योग दिंडी आपल्या दारी या अभियानांतर्गत पतंजलि योग समिती, अंबाजोगाई व ज्ञानदीप अकॅडमी, लोखंडी सावरगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ७५ व्या हिरक महोत्सवी योग विज्ञान शिबिराचा सांगता समारोह मंगळवार, दिनांक २८ मे रोजी आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राजयोगिनी ब्रम्हाकुमारी सुनिता दिदी (अंबाजोगाई सेवा केंद्र संचालिका), तर प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच मनोज देशमुख




(लोखंडी सावरगाव), नितेश शिराळे (मुख्याध्यापक, जि.प.प्रा.शा, सोनपेठ), धनंजय इंगळे (प्रभारी, पतंजलि योग समिती, अंबाजोगाई), सौ.स्वप्नाली शिराळे (चेअरमन, पिताजी सारडा नगरी व ग्रा.म.स.देवठाना), सौ.लक्ष्मी देवी (महिला सैनिक सीएआरपी), भानुदास देशमुख (किसान प्रभारी, पतंजलि योग समिती, अंबाजोगाई), दत्तात्रय दराडे (संचालक, ज्ञानदीप अकॅडमी), अभियंता अनिल लोमटे, भागवत कांबळे (योग शिक्षक व माजी अध्यक्ष रोटरी), सुनिता दराडे (संचालिका, ज्ञानदीप अकॅडमी), ब्रम्हाकुमारी प्रिया बहेनजी या उपस्थित मान्यवरांनी माजी सैनिक दत्ता लांब (योग शिक्षक व प्राकृतिक चिकित्सक) यांचा यथोचित सन्मान केला. तर यावेळी लागोपाठ तीन योग शिबिरांचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल दत्तात्रय दराडे यांना पतंजलिकडून मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह देण्यात आले. या प्रसंगी लांब यांनी फिटनेससाठी उपयुक्त ठरतील अशी योगासने शिकवली. अवघ्या सात मिनिटांत योगातील विविध ८४ आसने करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. तसेच शिवतांडव द्वारे मान्यवरांचे स्वागत केले. या ७५ व्या हिरक महोत्सवी शिबीरात २५० विद्यार्थी व नागरिकांना ही मोफत योग शिक्षण देण्यात आले. तर यावेळी अनेक मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त करताना लांब यांच्या निःशुल्क, निस्वार्थ योगसेवेचे कौतुक केले. लांब हे भारतीय सैन्यात फिजीकल शिक्षक म्हणून कार्यरत होते. म्हणून त्यांच्या अनुभवाचा आणि मौलिक मार्गदर्शनाचा फायदा सैन्य, पोलिस भरतीचे प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी लाभदायक ठरत आहे असे सांगितले. तसेच पतंजलि योग समितीच्या योग दिंडी आपल्या दारी या समाजोपयोगी अभियानाचे ही विशेष कौतुक केले. अध्यक्षीय समारोप राजयोगिनी ब्रम्हाकुमारी सुनिता दिदी (अंबाजोगाई सेवा केंद्र संचालिका) यांनी केला. दैनंदिन जीवनात योगाचे काय महत्त्व आहे. ते निःशुल्क शिकविण्याचे काम लांब हे करीत आहेत. अंबाजोगाई शहर व तालुक्यातील अनेक शाळा व महाविद्यालयातून विद्यार्थ्यांसाठी १५,९,६,३,२ व १ दिवसीय योग प्रशिक्षण शिबीर घेवून आजपावेतो त्यांनी ७५ शिबिरांमधून तब्बल ४५ हजारांहून अधिक विद्यार्थी आणि विद्यार्थीनींना दिनचर्या, आहार, योगिक डि.बिन्द्रिक, प्राणायाम, सर्व प्रकारचे आसन, योगनिद्रा, ध्यान यांचा अभ्यास व योगाचे धडे देण्याचे मौलिक काम माजी सैनिक लांब हे करीत आहेत. २१ वर्षे भारतीय सैन्य दलात असताना देखील लांब यांनी दरमहा आपली आर्धी पगार गोर-गरीबांसाठी खर्च केली आहे. सैन्यात देशसेवा करून निवृत्तीनंतर ही मागील १० महिन्यांहून अधिक काळ ते आपली आर्धी पेन्शन सामाजिक उपक्रमांसाठी खर्च करीत आहेत. ही खरच प्रेरणादायी व कौतुकास्पद बाब आहे. माजी सैनिक दत्ता लांब हे योगाच्या माध्यमातून समाजसेवा करीत आहेत. अंबाजोगाई शहर व परिसरातील युवक, युवती, ज्येष्ठ नागरिक यांना निःशुल्क, मोफत योग सेवा देवून त्यांचे स्वास्थ निरोगी राहण्यासाठी ते आहोरात्र प्रयत्नशील आहेत. या बाबत त्यांच्याशी संवाद साधला असता योग प्रशिक्षक लांब यांनी सांगितले की, पतंजलि योग समितीच्या माध्यमातून व ज्ञानदीप अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने युवा पिढीसाठी आम्ही लागोपाठ तीन वेळेस योग शिबीर आयोजित केले होते. या सर्व ७५ शिबिरांना विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. ही सर्व शिबीरे विद्यार्थ्यांसाठी मोफत आयोजित करण्यात आलेली होती. या पुढेही निःशुल्क आणि मोफत योग प्रशिक्षण देण्याचे काम आम्ही करणार आहोत. त्याचा लाभ अंबाजोगाईतील सर्व नागरिकांनी घ्यावा असे आवाहन माजी सैनिक योग प्रशिक्षक लांब यांनी केले आहे.

# विद्यार्थीदशेत झोकून देऊन अभ्यास करावा: जिल्हाधिकारी

## माद‌ळमोही अर्बन बँकेचा द्वितीय वर्धापनदिन आणि विद्यार्थी गुणगौरव सोहळा उत्साहात संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांनी विद्यार्थीदशेत असताना झोकून देऊन अभ्यास करावा, तसेच त्यांच्या पालकांनी त्यांच्या पाठीशी सदैव उभे राहावे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी गेवराई तालुक्यातील मादळमोही येथे विद्यार्थी गुणगौरव सोहळयाच्या प्रसंगी केले. तसेच आज मादळमोही अर्बन बँकेचा द्वितीय वर्धापन दिनानिमित्त जिल्हाधिकारी यांनी यावेळी शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमास जिल्हाधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीत विद्यार्थी गौरव सोहळा आणि मादळमोही अर्बन बँकेचा द्वितीय वर्धापन दीन उत्साहात साजरा करण्यात आला. गेवराईचे उपपोलीस अधीक्षक नीरज राजगुरू, स्टेट बँक ऑफ इंडिया चे शाखाधिकारी श्री.भुजबळ, सरपंच राजाभाऊ वारांगे यांची प्रमुख




उपस्थिती होती. यासह बँकेचे सदस्य, विद्यार्थी पालक बहुसंख्येने उपस्थित होते.




जिल्हाधिकारी यांनी, यावेळी विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल त्यांना शुभेच्छा दिल्या. तसेच विद्यार्थ्यांनी भविष्यात शिक्षणाला प्राधान्य दिले पाहिजे. निवडलेल्या क्षेत्रात वेळ देऊन अभ्यास केला पाहिजे. विद्यार्थ्यांनी स्वतःला सिद्ध करण्यासाठी योग्य मार्ग निवडायाला हवा. विद्यार्थ्यांपेक्षा ही पालकांची खरी परीक्षा असते. विद्यार्थ्यांसोबत खंबीरपणे उभे राहून विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन करणे ही पालकांची खरी जबाबदारी आहे असेही जिल्हाधिकारी यांनी यावेळी व्यक्त केले. याप्रसंगी त्यांनी मादळमोही अर्बन परिवारास पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. बँकेचे चेअरमन संदीप अंधाळे,यांनी प्रास्ताविकपर मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्ञानेश्वर राक्षे यांनी केले. यावेळी व्हाईस चेअरमन कैलास भुजबळ, संचालक पवन गावडे, निलेश भोपळे, सचिन तळेकर, अशोक पायघडे, सूरज चाळक ,प्रशांत धुत, माऊली दुधाळ, ज्ञानेश्वर मेरड, सुनील तळेकर, बापूराव राऊत व मोठ्या संख्येने मान्यवर उपस्थित होते.

## दिपाली पेंढारेचे यश

**पिंपळनेर । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील पिंपळनेर येथील रहिवासी असलेले दीपक पेंढारे यांची मुलगी दिपाली दीपक पेंढारे हिने दहावी बोर्ड परीक्षेत घवघवीत यश संपादन केले असून तिला ९९. ८०% गुण मिळाले आहेत.



दीपक पेंढारे काही दिवसापूर्वी बीड शहरात स्थायिक झाले असून त्यांची मुलगी शहरात शिकत होती नुकत्याच दहावी बोर्ड परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून या परीक्षेत दिपाली पेंढारे ने ९९. ८०% टक्के गुण प्राप्त केले आहेत. दिपाली पेंढारे ने विषयनिहाय पुढील प्रमाणे गुण प्राप्त केले आहेत, मराठी – ९०, संस्कृत – ९९, इंग्रजी – ९७, गणित – ९४, विज्ञान – ९६, इतिहास भुगोल –९८ एकूण ४९९ गुण, ९९.८० टक्के गुण मिळाले आहेत तिच्या या यशाबद्दल तिचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.


# धारूर ग्रामीण रुग्णालयाचा सावळा गोंधळ रुग्णांच्या मुळावर

## शालेय आरोग्य अधिकारी व आयुषच्या डॉक्टरांवर चालतेय धारूरचे ग्रामीण रुग्णालय

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

तालुक्यातील रुग्णांची सोय व्हावी म्हणून धारूर येथे सुसज्ज अशी ग्रामीण रुग्णालयाची इमारत उभारलेली आहे मात्र या रुग्णालयात सध्या सावळा गोंधळ सुरू असून रुग्णांच्या जीवाशी खेळले जात आहे अक्षरशः शालेय आरोग्य अधिकारी व आयुष चे डॉक्टर धारूर येथील ग्रामीण रुग्णालय चालवत आहेत त्यामुळे रुग्णांची मोठी गैरसोय होताना दिसून येत आहे

धारूर तालुका हा ऊसतोड मजुरांचा तालुका म्हणून ओळखला जातो ग्रामीण भाग असल्याने मोठ्या प्रमाणावर रुग्ण हे ग्रामीण रुग्णालयात रुग्णसेवा घ्यायला येतात यासाठी शासनाच्या वतीने



### प्रसुतीसाठी येणाऱ्या रुग्णांचे संदर्भित (रेफर) चे प्रमाण अधिक

सुसज्ज ग्रामीण रुग्णालय धारूर शहराच्या ठिकाणी उभारण्यात आलेली आहे मात्र प्रत्यक्षात या रुग्णालयात रुग्णांना सेवा मिळणे ऐवजी वेतना मिळत असल्याचे चित्र सध्या पाहायला मिळत आहे. प्रसूतीसाठी आलेल्या महिला रुग्णाला तर प्रससूतीच्या वेदना सोडून डॉक्टरांच्या निष्काळजीपणा व दुर्लक्षामुळे मोठ्या प्रमाणावर वेदना सहन कराव्या लागत आहेत वरून प्रसूती होत नाही म्हणून आंबेजोगाई येथील रुग्णालयात रेफर करण्याचे प्रमाणही मोठ्या प्रमाणावर या ग्रामीण रुग्णालयात वाढलेली आहे सध्या या रुग्णालयाचा कारभार डॉ. शशांक वाघमारे यांच्याकडे आहे. त्यामुळे या सर्व गोष्टी जबाबदार आहेत त्यामुळे त्यांनी धारूर ग्रामीण रुग्णालयातील चाललेला सावळा गोंधळ तात्काळ थांबून रुग्णांना चांगल्या प्रकारची रुग्णसेवा द्यावी अशी नागरिकांतून मागणी होत आहे.

ग्रामीण रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांशी व नातेवाईकांशी डॉक्टरांनी हुज्जत न घालता रुग्णांना वेळेवर उपचार करावेत ग्रामीण रुग्णालय अधीक्षकांनी रुग्णालयात हजर राहून रुग्णांची होणारी हेळसांड थांबवावी.

आतिक मोमीन, सामाजिक कार्यकर्ते

# परभणी पोलीसांनी सराईत गुन्हेगाराला परळीतून उचलले

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

परभणी जिल्ह्यासह परभणी शहरातील ठाण्याअंतर्गत वाढलेल्या मोटारसायकल चोरीचा आढावा पोलीस अधीक्षक रविंद्रसिंह परदेशी यांनी घेत तपासासाठी स्थानिक गुन्हा शाखेचे पथक तयार केले. पथकाने या चोरीचा छडा लावत आंबाजोगाई.येथील रहिवासी असलेल्या आरोपीला परळी येथून सापळा लावून मोठ्या शिताफीने ताब्यात घेत त्याच्याकडून २० मोटारसायकली जप्त केल्या. त्या आरोपीची चौकशी केल्यानंतर परभणी, सोलापूर व लातूर जिल्ह्यातील दहा गुन्हे केल्याची कबुली दिली.

या अनुषंगाने फौजदार अजित बिरादार, अंमलदार बालासाहेब तुपसमुंद्रे, रवी जाधव, रफियोद्दीन शेख, निलेश परसोडेख हुसैन पठाण, सायबरचे गणेश कौटकर, बालाजी रेड्डी, गौस पठाण यांच्या पथकाने गोपनीय मिळालेल्या माहितीवरून अखिल महेबूब शेख (रा. मंगळवार पेठ, अंबाजोगाई जि. बीड, ह.मु. परभणी) याने मोटारसायकल चोरीचे अनेक गुन्हे केल्याचे निष्पन्न झाल्यानंतर मोठ्या शिताफीने परळी येथून त्याला ताब्यात घेतले.गुन्हे शाखेचे सपोनि. भारती, मुत्तेपोड, फौजदार गोपीनाथ वाघमारे, अजित बिरादार यांच्याअधिपत्याखालील चार पथकांनी आरोपी अखिल याने दिलेल्या माहितीवरून बीड, परळी, लातूर, मरूड, बार्शी, सोलापूर अशा विविध ठिकाणांहून २० मोटार सायकली हस्तगत केल्या. या चोरीतील मोटार सायकलींची विल्हेवाट लावणारा त्याचाआणखी एक साथीदार असून त्याच्याकडे काही मोटारसायकली असल्याची माहिती आरोपी अखिलने पोलिसांना दिली.आरोपीकडून परभणी जिल्ह्यातील सहा, सोलापूर दोन व लातूर जिल्ह्यातील दोन असे एकूण दहा गुन्हे उघडकीस आले आहेत.आरोपी अखिलला न्यायालयात हजर केले असता त्याला दोन दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली.

# बीड पोलीसांचा सोशल मीडियावर वॉच

## ४०० जणांना नोटीस, १६ गुन्हे दाखल

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील जातीय वादावर आता कायदेशीर कारवाई सुरू झाली असून पोलिसांनी सोशल मीडिया अकाऊंटवरही वॉच ठेवला आहे. बीड लोकसभा निवडणुकांच्या प्रचारादरम्यान मराठा विरुद्ध मराठेत्तर असा वाद पाहायला मिळाला. तर, निवडणुका पार पडल्यानंतरही त्याचे पडसाद दिसून येत आहेत. बीडमध्ये मराठा आणि मराठेत्तर असा थेट राजकीय संघर्ष पाहायला मिळाला. त्यातूनच हा वाद सोशल मीडियातून अधिक तीव्र होतानाचे चित्र पाहायला मिळाले. त्यामुळे, बीड पोलीस प्रशासन आता खडबडून जागं झालं आहे. बीड जिल्ह्यात जातीय सलोखा आणि शांतता टिकवून ठेवण्यासाठी पोलिसांनी कारवाईला सुरुवात केली आहे. त्याच, अनुषंगाने जिल्ह्यात १६ गुन्हे दाखल झाले आहेत.



लोकसभा निवडणुकीदरम्यान बीड जिल्ह्यात टोकाच्या जातीय द्वेष पसरवण्याचं काम सोशल मीडियाच्या माध्यमातून होत झाल्याचं दिसून आलं. सोशल मीडियातील याच पोस्टमुळे अनेक ठिकाणी मोठा वाद निर्माण झाला असून काही ठिकाणी दगडफेकीच्याही घटना घडल्या आहेत.

४०० जणांना नोटीसा

बीड पोलिसांनी आता सोशल मीडियावर वॉच ठेवायला सुरुवात केली आहे. लोकसभा निवडणुकीच्या दरम्यान जवळपास २०० जणांवर कारवाई करण्यात आली असल्याची माहिती बीडचे जिल्हा पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांनी दिली आहे. तर, ३१६ पोस्टपैकी २६३ पोस्ट सोशल मीडियातून काढून टाकल्या आहेत. लोकसभा निवडणुकीदरम्यान बीड जिल्ह्यात सोशल मीडियावर ज्या पोस्ट वायरल झाल्या होत्या, आणि त्याचा परिणाम हा जातीय तेढ निर्माण करण्यासाठी झाला, त्या सगळ्या पोस्ट पोलिसांनी सोशल मीडियातून हटवल्या आहेत. एवढेच नाही तर येणाऱ्या मतमोजणीच्या अनुषंगाने कुठल्याही प्रकारचा हिंसाचार होऊ नये, म्हणून सोशल मीडियावर टोकाचे लिखाण करणाऱ्या ४०० पेक्षा जास्त जणांना बीड पोलिसांनी नोटीसही जारी केल्या आहेत.

# प्रा. रविंद्र घाडगे यांना बंधुशोक

**बीड । प्रतिनिधी**

वेबझ इंडिया प्रा.लि.चे संचालक प्राध्यापक रवींद्र घाडगे यांचे बंधू जितेंद्र अशोक घाडगे यांचे हृदयविकाराच्या झटक्याने बुधवार दिनांक २९ मे रोजी दुपारी ११:३० वाजता उपचार चालू असताना निधन झाले.



मृत्यू समयी त्यांचे वय ३६ वर्षे होते. त्यांच्यावर शहरातील मोंढा भागातील स्मशानभूमीत दुपारी ४:३० वाजता शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांचा राख सावरण्याचा कार्यक्रम आज सकाळी ८.३० वाजता होणार आहे.

जितेंद्र अशोक घाडगे हे गेल्या काही दिवसांपासून आजारी होते त्यातच त्यांना हृदय विकाराचा झटका आला त्यांच्यावर उपचार चालू असताना बुधवारी दुपारी ११:३० वाजता त्यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले मृत्यू समय त्यांचे वय ३६ वर्षे होते त्यांच्यावर दुपारच्या ४.३० वाजता मोंढा रोडवर असलेल्या स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले .यावेळी नातेवाईक मित्रपरिवार शहरातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या पश्चात आई, एक भाऊ ,वहिनी,पुतणे असा परिवार आहे. या घटनेबद्दल सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

प्रा.रविंद्र घाडगे आणि त्यांचे बंधू जितेंद्र घाडगे यांनी हालाखीचे दिवस काढले मात्र कष्टाने शिक्षण घेवून आपापले व्यवसाय सुरू केले. मोठ्या कष्टाने पुढे जाण्याचा प्रयत्न करत असतानाच प्रा.रविंद्र घाडगे यांचे बंधू जितेंद्र घाडगे यांना आजाराने ग्रासले. गेल्या काही दिवसांपासून त्यांची प्रकृती अत्यंत खराब झाली होती. त्यांच्यावर उपचार चालू असताना त्यांना हृदयविकाराचा झटका आला आणि यातच त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला.

# गावठी कट्ट्याचा धाक दाखवून पवनचक्की प्रकल्पाच्या अधिकाऱ्याचे अपहरण

## दोन कोटी रुपयाच्या खंडणीची मागणी

**केज । प्रतिनिधी**

केज जवळील महामार्गावरील टोल नाक्या जवळ गाडी अडवून गावठी कट्टयाचा धाक बारा ते तेरा जणांनी पवन चक्की प्रकल्पाच्या अधिकाऱ्याचे अपहरण करून त्याच्याकडे दोन कोटी रु च्या खंडणीची मागणी केली असल्याचा खळबळजनक प्रकार घडला आहे.,

या बाबतची माहिती अशी की, अवादा या पवनचक्की प्रकल्पाच्या उभारणीचे काम करीत असलेले टागोर नगर नाशिक जिल्ह्यातील टागोर नगर येथील सुनिल केदु शिंदे (ह. मु. जालना रोड बीड) आणि त्यांचे सहकारी हे दि. २८ मे रोजी रात्री बीड कडून केजकडे येत असताना त्यांना रात्री सुमारे ११:०० वा च्याच सुमारास मस्साजोग ते केज दरम्यान गंगा माऊली साखर कारखान्याला जवळ असलेल्या टोल नाक्याच्या पुढे एका पांढऱ्या रंगाच्या स्कॉर्पिओ गाडी क्र (एम एच १५/ ई बी २६८२) सीह्याचं चालकाने एशर करून त्यांची गाडी थांबविण्याचा इशारा केला एका त्यांच्या सुनील शिंदे यांनी गाडी थांबवली असता रमेश घुले रा. केज याने अधिकारी सुनिल शिंदे यांना आपण अधिगृहण करीत असलेल्या पवनचक्कीच्या जागे संदर्भात बोलायचे आहे. असे म्हणुन रमेश घुले रा. केज याने त्याच्या कडील गावठी कट्ट्याचा धाक दाखवुन त्याचे सोबत असलेल्या सहकाऱ्यांनी संगणमत करुन बळजबरीने सुनिल शिंदे यांचे अपहरण करुन त्याच्या स्कार्पिओ गाडीमध्ये बसवुन त्यांना माजलगाव मार्गे अहमदनगर जिल्ह्यातील खरवंडी ता. पाथर्डी येथे घेवुन गेले. तेथे त्यांनी सुनिल शिंदे आणि त्यांचे सहकारी यांना कंपनीचे काम करायचे असेल तर दोन कोटी रु. ची खंडणी दयावी लागेल अशी धमकी देत खंडनीची मागणी केली. दरम्यान सुनिल शिंदे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी त्यांची सुटका करून घेत केज दि. २९ मे रोजी रात्री के ज पोलीस ठाण्यात रमेश घुले आणि त्याचे अकरा ते बारा साथीदार यांच्या विरुद्ध अपहरण करून खंडणी मागणे व शस्त्र प्रतिबंधक कायद्या नुसार के ज पोलीस ठाण्यात गु. र. नं. २८५/२०२४ भा. दं. वि. ३६५, ३८५, १४३, १४७, १४८, १४९या सह शस्त्र प्रतिबंधक कायदा कलम ४, २५ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. केज पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी प्रशांत महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरिक्षक आनंद शिंदे हे तपास करीत आहेत.

# इंटर्नशिपच्या नावाखाली तरूणांना फुकटात राबवून घेण्याची माहिती विभागाची अग्नीवीर टाइप योजना

**मुंबई । प्रतिनिधी**

माहिती आणि जनसंपर्क विभागात अधिकारी, कर्मचारयांची वाणवा आहे.. या विभागातील अनेक उपसंचालक, जिल्हा माहिती अधिकारी, सहाय्यक माहिती अधिकरयांच्या जागा वर्षानुवर्षे रिक्त आहेत..त्या भरल्या जात नाही.. त्यामुळे माहिती आणि जनसंपर्क विभागानं ''अग्नीवीर'' टाइपची योजना विभागात आणली आहे.. पत्रकारितेचं शिक्षण घेणारया मुलांना आंतर्वासिता अर्थात इंटर्नशिपच्या नावाखाली फुकटात राबवून घेण्याची ही योजना आहे... तीन महिन्यासाठी ही इंटर्नशिप योजना असून या काळात प्रशिक्षण घेणारयांना कोणतेही मानधन, प्रवास भत्ता, अथवा निवास व्यवस्था दिली जाणार नाही असं माहिती जनसंपर्क विभागानं या संबंधात प्रसिध्द केलेल्या जाहिरातीत म्हटलं आहे..



मुद्रीत माध्यम, दृकश्राव्य माध्यम, वेब माध्यम, समाज माध्यम अशा विविध माध्यमांचा जवळून अभ्यास करण्याची संधी मुलांना मिळणार असल्याची ''लालूच'' या जाहिरातीत दाखविली गेली आहे..

माहिती आणि जनसंपर्क विभाग म्हणजे पांढरा हत्ती झाला आहे.. त्यामुळं सरकारचंही या विभागाकडे लक्ष नाही.. परिणामत:विभागातील रिक्त जागाही सरकार भरत नाही.. त्यामुळे फुकटचं मनुष्यबळ वापरून घेण्याची ही योजना असल्याचा आरोप एस.एम देशमुख यांनी केला आहे.. प्रत्यक्षात तीन महिन्यात मुलांना खरंच काही शिकायला मिळेल का? याबद्दल आम्ही साशंक आहोत.. कारण माहिती जनसंपर्क विभाग जाहिराती, फिल्म, मुद्रण यासारखी अनेक कामं बाहेरून करून घेत असते .. त्यामुळे फुकटात मुलांना राबवून घेणं हाच या योजनेचा उद्देश दिसतो आहे. पत्रकारितेच्या मुलांना खरंच चांगला अनुभव मिळावा अशी सरकारची प्रामाणिक इच्छा असेल तर मुलांची निवड करून त्यांची मुंबईत राहण्याची व्यवस्था करावी, मुलांना स्टायफंड द्यावा अशी मागणी मराठी पत्रकार परिषदेने केली आहे.. या संदर्भात लवकरच मुख्यमंत्र्यांना निवेदन पाठविण्यात येणार असल्याचे एस.एम.देशमुख यांनी स्पष्ट केले आहे.

# मोहा गावाजवळ सापडला बेवारस मृतदेह

## सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी यांनी बेवारस मृतदेह आणला ग्रामीण रुग्णालयात

जामखेड । प्रतिनिधी

सध्या उन्हाचा कडाका भयंकर वाढलेला आहे. उष्माघाताचा त्रास अनेकांना जाणवतो. आज मोहा गावाजवळ एक मृतदेह असल्याचा फोन सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी यांना आला कोठारींनी पोलीस प्रशासनाला माहिती देत बेवारस मृतदेह ग्रामीण रुग्णालय आणला.

जामखेड पासून पाच किलोमीटर अंतरावर उष्माघाताने एका वृद्धाचा मृत्यू झाल्याची बातमी समजली मंगळवार दिनांक २८/५/२०२४ रोजी दुपारी चार वाजता मोहा गावाजवळ पाईप फॅक्टरीच्या




बाजूला एक माणूस उन्हात रोडवर पडलेला आहे अशी माहिती सुनील रेडे यांनी दिली माहिती समजताच सामाजिक कार्यकर्ते आपली रुग्णवाहिका घेऊन दीपक भोरे यास सोबत घेऊन घटनास्थळी भर उन्हाच्या पारात दाखल झाले.

घटनेची माहिती पोलीस निरीक्षक महेश पाटील यांना संजय कोठारी यांनी दिली यावेळी महेश पाटील स्वतः घटनास्थळी दाखल झाले सोबत पोलीस कॉन्स्टेबल दीपक बोराटे ,कुलदीप गुळवे, शिवाजी भोस ,सचिन भापकर, पोलीस नाईक सरोदे आदींनी मदत केली.

महत्त्वाचे म्हणजे साधारण ४३ डिग्री सेल्सिअस उन्हाचे तापमान असल्यामुळे या व्यक्तीस पिण्यास पाणी न मिळाल्याने उन्हाच्या तडाख्याने त्याचा मृत्यू झाला असावा असे सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी म्हणाले त्याला उचलताना त्याच्या अंगाची सालटे निघाले होते त्यास संजय कोठारी यांनी आपल्या रुग्णवाहिकेत आणून जामखेड येथील शवविच्छेदन गृहात टाकण्यात आले. पुढील तपास पोलीस निरीक्षक महेश पाटील करत आहेत.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...

पुणे विशेष



# पुणे पोलीस आयुक्तालयात दारूची पार्टी?

## आढळल्या दारुच्या बाटल्या; आयुक्तांच्या कारवाईकडे लक्ष

पुण्यातील कल्याणी नगर परिसरात एका धनिकपुत्राने आलिशान पोर्शे कारने दोन तरुणांना उडवले. यामध्ये त्या दोघांचा जागीच मृत्यू झाला. यानंतर घडलेल्या नाट्यमय घडामोडीनंतर पुणे पोलिसांवर संताप व्यक्त करण्यात येत आहे. हा प्रकार ताजा असतानाच आणखी एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. पुणे पोलीस आयुक्तालयाच्या आवारात दारूच्या बाटल्या सापडल्या आहेत. याचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. त्यामुळे पोलीस ऑन ड्युटी ड्रिंक करुन काम करतात की काय? असा प्रश्न पुणेकरांना पडला आहे. या गंभीर प्रकारावर पोलीस आयुक्त अमितेश कुमार काय कारवाई करतात याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे.




पुणे पोलीस आयुक्तालयाच्या आवारात दारुच्या बाटल्या सापडल्याने एकच खळबळ उडाली आहे. पोलीस आयुक्तालयातच पोलीस ओली पार्टी करत असल्याचे यावरुन स्पष्ट होते. मात्र, ही ओली पार्टी नेमकं कोण करतं असा प्रश्न उपस्थित करण्यात येत आहे. तसेच आयुक्तालयात येणाऱ्या प्रत्येकाची चेकींग आणि रजिस्टरमध्ये नोंद केली जाते. एवढी सुरक्षा असताना आयुक्तालयात दारुच्या बाटल्या आल्या कशा आणि कोणी आणल्या? कोण कोणत्या अधिकाऱ्यांनी, कर्मचाऱ्यांनी आयुक्तालयात ओली पार्टी केली याची माहिती अद्याप समोर आलेली नाही. मात्र, या गंभीर प्रकाराची दखल वरिष्ठ घेऊन संबंधितांवर कारवाई करणार की चौकशी करणार असल्याचे सांगून हा प्रकार दाबणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

पुणे पोलीस आयुक्तालयाच्या आवारात दारूच्या रिकाम्या बाटल्या पडल्याचा व्हिडीओ सोशल मिडीयावर व्हायरल झाला आहे. पोलीस आयुक्तलयाच्या आवारात गुन्हे शाखेची इमारत आहे. याच इमारतीच्या काही अंतरावर आणि पाठीमागे मोठ्या प्रमाणात रिकाम्या दारुच्या बाटल्या सापडल्या आहेत. पोलीस आयुक्तालयात सर्वसामान्यांना यायचे असेल तर गेटवर त्यांची संपूर्ण चौकशी केली जाते. त्यांचे नाव, ओळखपत्र, काय काम आहे, कोणाला भेटायचे आहे, अशी सर्व चौकशी करुन नागरिकांना आत सोडले जाते. सहजासहजी सामान्य नागरिकांना आयुक्तालयात येणं शक्य नाही. तसेच जर एखादा व्यक्ती गाडी घेऊन आला तर पोलिसांकडून त्या गाडीची तपासणी केली जाते. एवढी सुरक्षा घेतली जात असताना पोलीस आयुक्तालयात दारुच्या बाटल्या आणल्या कोणी? एकीकडे पुण्यात ड्रंक अँड ड्राईव्हचा प्रकार घडला असताना आयुक्तालयात ऑन ड्युटी ड्रिंक असा काही प्रकार आहे का? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

दरम्यान, पुण्यातील ड्रंक अँड ड्राईव्ह प्रकरणात आरोपच्या रक्ताचे नमुने बदलण्यात आल्याचा प्रकार समोर आला. या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी काल चौकशी पथक ससुन हॉस्पिटलमध्ये आले होते. त्यावेळी या पथकाला एका नामांकित हॉटेलमधून बिर्याणी मागवल्याचा प्रकार समोर आला होता. त्यानंतर आज (बुधवार) पोलीस आयुक्तालयाच्या आवारात रिकाम्या दारुच्या बाटल्या मोठ्या प्रमाणात आढळून आल्याचे व्हिडीओतून समोर आले आहे. त्यामुळे पुणे पोलिस आयुक्तालयात चाललंय काय? असा प्रश्न उपस्थित होत आहे. आयुक्तालयातील हा प्रकार अत्यंत गंभीर असून पोलीस आयुक्त अमितेश कुमार या प्रकरणाची कशी दखल घेतात आणि काय कारवाई करणार हे पाहावं लागेल.

# ससूनचे डीन विनायक काळे सक्तीच्या रजेवर

## अजय तावरे, श्रीहरी हरनोळ निलंबित

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे अपघात प्रकरणातील ब्लड सॅम्पल अदलाबदल प्रकरणात मोठी कारवाई करण्यात आली आहे. बी जे मेडिकल कॉलेजचे अधिष्ठाता डॉक्टर विनायक काळे यांना तात्काळ सक्तीच्या रजेवर पाठवण्यात आले आहे. त्यांच्या जागेवर अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय बारामती या ठिकाणचे अधिष्ठाता डॉ.चंद्रकांत म्हस्के यांच्याकडे अतिरिक्त कारभार सोपवण्यात आला. दरम्यान, ब्लड सॅम्पल फेकून देऊन लाच खाणाऱ्या डॉक्टर अजय तावरे, डॉक्टर श्रीहरी हरनोर यांचे वैद्यकीय शिक्षण विभागाच्या वतीने निलंबन करण्यात आले आहे.

कल्याणी नगर, पुणे येथील पोर्शे कार अपघात प्रकरणामध्ये ससून सर्वोपचार रुग्णालय पुणे येथे केलेल्या वैद्यकीय तपासणी व उपचारासंदर्भात झालेल्या गैरप्रकाराची चौकशी करण्यासाठी गठित करण्यात आलेल्या समितीने त्यांचा अहवाल सादर केला आहे. समितीने डॉ. अजय तावरे, प्राध्यापक व विभागप्रमुख,



न्यायवैद्यकशास्त्र व डॉ. श्रीहरी हाळनोर, वैद्यकीय अधिकारी, बै.जी. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व ससून रुग्णालय, पुणे यांच्याविरुध्द कारवाई करण्याची शिफारस केली आहे. त्यानुसार कारवाई करण्यात आली आहे.

याशिवाय ससून फेरफार प्रकरणात समिती नेमली होती त्या समितीचा अहवाल आला. यानुसार कारभारावर नियंत्रण ठेवण्यात कमी पडल्याचा ठपका ठेवत अधिष्ठाता विनायक काळे यांना सक्तीच्या रजेवर पाठवण्यात आले आहे. अल्पवयीन आरोपी घटना घडली तेव्हा नशेत होता, हे सिद्ध होऊ नये यासाठी डॉक्टरांनी लाचेच्या लालसेपोटी अल्पवयीन आरोपीच्या रक्ताचे नमुने बदलेले असल्याचा आरोप डॉक्टरांवरती आहे. पुण्यातील पोर्शे कार अपघात प्रकरणी रोज नवे अपडेट समोर येत आहेत. अल्पवयीन मुलाच्या आरोपीचे वडिल विशाल अग्रवाल यांच्याकडून १४ फोन कॉल करण्यात आल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे. अजय तावरे ब्लड सॅम्पल बदलताना अल्पवयीन मुलाच्या वडिलांशी सातत्याने बोलत होता, असे स्पष्ट झाले आहे. अजय तावरे, डॉ. श्रीहरी हाळनोर, यांना तात्काळ निलंबित करण्यात आले आहे. यांच्याविरूध्द जोपर्यंत निलंबनाचे आदेश अंमलात आहेत, त्यांना निर्वाह भत्ता आणि पूरक भत्ते देय राहतील, असे सांगण्यात आले आहे.

# मतमोजणी केंद्रावर विशेष कार्यकारी दंडाधिकारी यांची नियुक्ती

**पुणे । प्रतिनिधी**

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीची मतमोजणी ४ जून रोजी होणार असून ही प्रक्रिया शांततेत व निःपक्षपाती वातावरणात पार पाडली जावी व कोठेही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी प्रत्येक मतमोजणी केंद्रावर विशेष कार्यकारी दंडाधिकारी यांची नेमणूक करण्यात आल्याचे आदेश जारी करण्यात आले आहेत.

फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम २१ अन्वये या विशेष कार्यकारी दंडाधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली असून त्यांना संहिता कलम १२९. १३३, १४३ व १४४ खाली अधिकार बहाल करण्यात आले आहेत.

मावळ लोकसभा मतदार संघाची मजमोजणी बालेवाडी स्टेडीयम येथे होणार असून त्या ठिकाणी पिंपरी चिंचवड अप्पर तहसील कार्यालयातील निवासी नायब तहसीलदार प्रवीण ढमाले (९८५०५०४५८८) यांची नेमणूक विशेष कार्यकारी दंडाधिकारी म्हणून करण्यात आली आहे. पुणे आणि बारामती लोकसभा मतदार संघाची मतमोजणी एफसीआय गोडावून कोरेगाव पार्क, पुणे येथे होणार असून त्याठिकाणी पुणे येथील निवासी नायब तहसीलदार शंकर ठुबे (९८२२६५२७३७) यांची नेमणूक करण्यात आली आहे. शिरुर लोकसभा मतदार संघाची मतमोजणी होणाऱ्या महाराष्ट्र औद्योगिक वखार महामंडळाचे गोडावून नं. २, ब्लॉक पी-३९, एमआयडीसी एरिया रांजणगाव, कारेगांव, ता. शिरुर येथे शिरूर तहसिल कार्यालयातील नायब तहसीलदार स्नेहा गिरी गोसावी (९४२००१३९४६) यांची नियुक्ती विशेष कार्यकारी दंडाधिकारी म्हणून करण्यात आल्याचे आदेश अपर जिल्हा दंडाधिकारी तथा नोडल अधिकारी कायदा सुव्यवस्था ज्योती कदम यांनी जारी केले आहेत.

# भोर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुलांच्या शासकीय वसतिगृहाच्या प्रवेश प्रक्रियेस सुरुवात

**पुणे । प्रतिनिधी**

भोर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह येथे २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाकरीता प्रवेश प्रक्रियेस सुरुवात झाली असून इच्छुकांकडून प्रवेशासाठी अर्ज मागविण्यात आले आहेत.

या वसतिगृहात इयता ८ वी ते १० वी, कनिष्ठ महाविद्यालय, तंत्रनिकेतन, बिगर व्यवसायिक, व्यावसायिक व औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग, शारीरिक दृष्ट्या दिव्यांग व अनाथ या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शासन नियमानुसार आरक्षित टक्केवारीप्रमाणे त्या त्या प्रर्वगात गुणवत्तेनुसार मोफत प्रवेश देण्यात येणार आहे.विद्यार्थ्यांना विनामूल्य निवास, शैक्षणिक बाबींकरीता सहाय्य, निर्वाह भत्ता आदी सुविधा पुरविण्यात येणार आहे. प्रवेश अर्ज भोर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृहात उपलब्ध असून इच्छुकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन वसतिगृहाचे गृहपाल यांनी केले आहे.

# विद्यापीठात सायबर सिक्युरिटीवर अभ्यासक्रम जूनपासून राबविणार अभ्यासक्रम

**पुणे । प्रतिनिधी**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि ट्रान्सिडेंटल टेक्नॉलॉजीज यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठात सायबर सिक्युरिटी, सायबर फॉरेन्सिक्स आणि सायबर क्राइम इन्व्हेस्टिगेशन या विषयांतील सर्वसमावेशक व्यावसायिक प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू केला आहे. येत्या १३ जून २०२४ पासून सुरू होणारा हा अभ्यासक्रम ऑनलाइन आणि ऑफलाइन अशा दोन्ही पद्धतीने घेण्यात येणार आहे. विद्यार्थी, व्यावसायिक आणि कायद्याची अंमलबजावणी करणार्या कर्मचार्यांमध्ये माहिती प्रणालीचे रक्षण करण्याची आणि सायबर गुन्ह्यांचा सामना करण्यासाठी आवश्यक कौशल्ये असावीत, या उद्देशाने हा अभ्यासक्रम बनविण्यात आला आहे.



यात दोन महिन्यांचा कालावधी असलेला १८ क्रेडिटचा सायबर सिक्युरिटी स्पेशॅलिस्ट, सहा महिन्यांचा कालावधी असलेला २० क्रेडिटचा मास्टरिंग इन्फॉर्मेशन सिक्युरिटी आणि सहा महिन्यांचा कालावधी असलेला २८ क्रेडिटचा सायबर क्राइम इन्वेस्टिगेटर या अभ्यासक्रमांचा समावेश आहे. हे अभ्यासक्रम डायरेक्ट ॲक्शन इंटरनॅशनल यूके आणि कॅनेडियन असोसिएशन फॉर सिक्युरिटी अँड इंटेलिजेन्स स्टडीज, व्हँकुव्हर कॅनडाद्वारे मान्यताप्राप्त आहेत. या अभ्यासक्रमात आक्षेपार्ह आणि बचावात्मक सुरक्षा, एसओसी आणि एसआयईएम, सायबर इंटेलिजन्स आणि इन्व्हेस्टिगेशन, डार्क वेब, सायबर फॉरेन्सिक्स आणि क्लाउड सुरक्षा, नेटवर्क सुरक्षा आणि क्रिप्टोग्राफी यांसारख्या महत्त्वाच्या विषयांचा समावेश केला आहे. या अभ्यासक्रमात सायबर सिक्युरिटी, कायदा अंमलबजावणी आणि नॅशनल सिक्युरिटी क्षेत्रातील ४० हून अधिक राष्ट्रीय तज्ज्ञ विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत.

# कहत गुनिजान मधून उलगडला पंडित सी. आर. व्यास यांचा सांगीतिक विचार

**पुणे । प्रतिनिधी**

पंडित सी. आर. व्यास यांच्या सांगीतिक विचारांची आणि त्यांनी रचलेल्या अर्थपूर्ण बंदिशिंची सप्रयोग चर्चा करणारा असा विशेष कार्यक्रम प्रसिद्ध गायिका अपर्णा केळकर आणि प्रसिद्ध संवादिनी वादक डॉ. चैतन्य कुंटे यांनी सादर केला.

स्वानंदी क्रिएशन प्रस्तुत 'कहत गुनिजान' ही सांगीतिक मैफल श्रीराम लागू रंग-अवकाश येथे आयोजित करण्यात आली होती. पंडित सी. आर. व्यास यांच्या स्वरचित बंदिशींमधील साहित्य व सांगीतिक विचार या मैफलीतून मांडला गेला.




स्वानंदी क्रिएशन प्रस्तुत कार्यक्रमात अपर्णा केळकर, डॉ. चैतन्य कुंटे यांचा सहभाग

अपर्णा केळकर यांनी राग धनकोनी कल्याण रागातील 'सरस सुर गाऊँ...' या बंदिशीच्या गायनातून रागभाव आणि काव्यभावाची सुंदर पेशकश केली. नित लगो ध्यान (रागेश्री), दरबार सुना तुमबिन (सगेरा), सुरज चंदा जबतक फिरे (नटभैरव), चतुर तुम हो प्राण पिया (स्वानंदी), तू है रंगीला (मालव), नित रहे मगन (शिवअभोगी), हो सुरन में रस तुम (ललित), हो न कर छोडूं (जोगिया) या बंदिशींतून पं. व्यास यांची गुरुभक्ति प्रकट झाली. सोही रिझाए (शुद्धकल्याण), मितवा कित (कैशिकरंजनी) आणि पूरियाधनाश्री रागातील तराना अशा प्रासंगिक बंदिशींच्या मागचे रोचक विचार डॉ. कुंटे यांनी विवेचनातून स्पष्ट केले. कोमल ऋषभ आसावरी, कीरवाणी या रागात देवताविषयक बंदिशी पेश झाल्या, तर मोरे नैनवा तरस रहे (मारुबिहाग), तोहे आन मोरी (मधुवंती) ह्या बंदिशींतून शृंगाराचे रंग दिसले. मैफलीचा समारोप अपर्णा केळकर यांनी आध्यात्मिक आशयाच्या सांझ की बेर सुमिर हरिनाम (श्री) आणि तज रे अभिमान (बिलासखानी तोडी) या भावगर्भ बंदिशींच्या प्रभावी गायनाने केला. डॉ. चैतन्य कुंटे यांच्या निरुपणातून ह्या बंदिशींतील सौंदर्यस्थळे रसिकांना उलगडत गेली. कौशिक केळकर यांनी समर्पक तबलासाथ केली.व्यासबुवा यांच्या ज्येष्ठ शिष्या निर्मलाताई गोगटे, रमाकांत परांजपे, शुभदाताई मोघे, अजय पराड, प्रा. प्रकाश भोंडे, अरुंधतीताई महांबरे यांच्यासह अनेक मान्यवरांना मैफलीचा आनंद घेतला. कार्यक्रमाविषयी माहिती देत संजय गोखले यांनी कलाकारांचा परिचय करून दिला. स्वानंदी क्रिएशनतर्फे मकरंद केळकर यांनी या मैफलीचे आयोजन केले होते.


# अपघातग्रस्त पोर्शे गाडीची नोंदणी रद्द; पुणे आरटीओचे आदेश

**पुणे । प्रतिनिधी**

कल्याणीनगर अपघातातील पोर्शे गाडीची (झींपश झींीलहश -ललळवशपीं) तपासणी केल्यानंतर मोटार वाहन कायद्यातील कलम १९९ नुसार, त्या गाडीची रजिस्ट्रेशन (तात्पुरती नोंदणी) रद्द करण्याचे आदेश पुणे आरटीओ कार्यालयाकडून देण्यात आले आहेत. यामुळे या गाडीला आता येथून पुढे रस्त्यावर धावण्यास कायमची बंदी असणार आहे.

कल्याणीनगर येथे झालेल्या अपघातात इंजिनिअर तरुण आणि अश्विनी यांना आपले जीव गमवावे लागले. त्या पार्श्वभूमीवर पुणे पोलिसांकडून या घटनेचा जोरदार तपास सुरू होता. त्यासोबतच प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या पथकाकडून देखील अपघातग्रस्त वाहनाची वेळोवेळी तपासणी करण्यात आली होती. त्यानंतर बुधवारी (दि.२९) रोजी पुणे आरटीओकडून अपघातग्रस्त पोर्शे कारची नोंदणी रद्द करण्याचे आदेश काढण्यात आले आहे. मात्र ही कार्यवाही बेंगलोर येथील प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून केली जाणार आहे. कारण या गाडीला तात्पुरता वाहन



परवाना म्हणजेच नोंदणी परवाना बंगलोर आरटीओकडून देण्यात आला होता. त्यामुळे ही नोंदणी देखील बेंगलोर आरटीओ कडूनच रद्द केली जाणार आहे.

मोटार वाहन कायदा १९९ ची उल्लंघन झाल्याने संबंधित अपघात ग्रस्त वाहनाची नोंदणी १२ महिन्यांकरता का रद्द करण्यात येऊ नये, अशी नोटीस अपघात ग्रस्त वाहन मालकाला जारी करण्यात आली होती. विहित मुदतीत उत्तर न आल्याने त्या वाहनाची तात्पुरती नोंदणी मोटर वाहन कायदा कलम ५५ (५) नुसार रद्द करण्याचे आदेश जारी केले आहेत. व मूळ जारी करणारे प्राधिकारी आरटीओ बेंगलोर सेंटर यांना पुढील कार्यवाहीसाठी कळविण्यात आले आहे.

संजीव भोर, प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे

# अल्पवयीनच्या खुनाचा प्रयत्न करणाऱ्या तिघांना अटक

**तळेगाव दाभाडे । प्रतिनिधी**

देह विक्रीसाठी नकार देणार्या अल्पवयीन मुलीचा गळा दाबून व चाकूने वार करत खून करण्याचा प्रयत्न करणार्या तिघांना शिरगाव पोलिसांनी अटक केली आहे. ही घटना रविवार (दि. २६) व सोमवार (दि. २७) या दोन दिवसांच्या कालावधीत मावळातील सोमाटणे परिसरात घडली.

याप्रकरणी १६ वर्षीय मुलीने शिरगाव पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. यावरून पोलिसांनी पवनकुमार अयोध्या प्रसाद (वय २३ रा. उत्तर प्रदेश) महिला आरोपी व दीपक गोवारी यादव (वय २१ रा. उत्तर प्रदेश) या तिघांना अटक केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दीपक यांनी पिडीतेशी प्रेमसंबंध तयार केले. त्यानंतर पवनकुमार व महिला आरोपीने तिच्याकडे देहविक्रीची मागणी केली. या वेळी पीडितेने त्यांना नकार दिला. तिला मूळगावी सोडण्याचा बहाणा करून तिला दुचाकीवर घेऊन जाऊन महिला आरोपीच्या भाड्याच्या खोलीत तिला ठेवले. त्यानंतर सोमवारी सायंकाळी अंधारात घेऊन जाऊन तिच्या मानेच्या पाठीमागील बाजूला चाकूने वार केला. तसेच, गळा दाबून तिला जीवे मारण्याचा प्रयत्न केला. मात्र, पीडितेने आपली सुटका करून घेत थेट पोलिसांकडे तक्रार केली. पोलिसांनी तिघांना अटक केली असून, शिरगाव पोलिस तपास करत आहेत.

# लष्कर पाणीपुरवठा केंद्रावर महिलांचा मोर्चा : नागरिक आक्रमक

कोंढवा : : कोंढव्यातील इशरतबाग वसाहतीत पाणी येत नसल्यामुळे नागरिकांना हंडाभर पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे. आधी आम्हाला वेळेवर भरपूर पाणी मिळत होते; आता अचानक काय झाले? असा प्रश्न उपस्थित करीत परिसरातील महिला व नागरिकांनी लष्कर पाणीपुरवठा केंद्रावर मोर्चा काढून आधिकार्यांना घेराव घातला. अनधिकृत नळजोडणी करणार्यांवर कारवाई करून आम्हाला आमच्या हक्काचे पाणी द्या, अशी मागणी या वेळी करण्यात आली

प्रभाग क्रमांक २६ मधील इशरतबाग वसाहतीमध्ये गेल्या दोन महिन्यांपासून पुरेसे पाणी मिळत नसल्याने नागरिक संतप्त झाले आहेत. त्यांनी माजी नगरसेविका नंदा लोणकर यांच्या नेतृत्वाखाली लष्कर पाणीपुरवठा केंद्रावर मोर्चा काढत अधिकार्यांना घेराव घालला. या मोर्चात महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. इशरतबाग वसाहतीत अनधिकृत नळजोड करणार्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करा, येत्या सात दिवसांत या भागातील पाणीपुरवठा सुरळीत करा; अन्यथा यापेक्षा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा या वेळी नागरिकांनी आधिकार्यांना दिला आहे.

इशरतबाग परिसराची लोकसंख्या ५ हजारांपेक्षा जास्त असून, या भागात अवघे दोन मीटरचे रस्ते आहेत. यामुळे या ठिकाणी टँकर देखील जात नाहीत. एनआयबीएम कॅम्पसपासून एक किलोमीटर व लष्कर पाणीपुरवठा विभागापासून पाच ते सात किलोमीटर अंतरावर हा भाग आहे. सध्या या परिसरात टोलेजंग इमारती उभ्या राहत असून, त्यांना आमच्या वाट्याचे पाणी अनधिकृतपणे दिले जात आहे. त्यामुळे आम्हाला पाणी मिळत नसल्याचा आरोप या वेळी नागरिकांनी केला. याबाबत लष्कर



पाणीपुरवठा केंद्राचे कार्यकारी अभियंता सुभाष पावरा यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता तो होऊ शकला नाही. माजी शिक्षण मंडळ सदस्य नारायण लोणकर, झोयब काझी, रुबिना शेख, सुलताना जमादार, समीर शेख आदींसह वसाहतीमधील शेकडो महिला आणि नागरिक या मोर्चात सहभागी झाले होते.

cmyk